# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१४ / आग्रहनय २५, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | मुख्यमंत्री | |
| (३) | मदत, पुनर्वसन व भूकंप पुनर्वसन मंत्री | |
| (४) | गृहनिर्माण मंत्री | |
| (५) | कामगार मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना मंत्री | |
| (७) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री | |
| (८) | अन्न आणि औषध प्रशासन मंत्री | |
| (९) | जलसंपदा मंत्री | |
| (१०) | परिवहन मंत्री | |
| (११) | पर्यावरण मंत्री | |
| (१२) | उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री | |
| (१३) | सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ८०**

### ठाणे जिल्ह्यासह राज्यामध्ये अनेक औषध दुकानांतून देशामध्ये विक्री करण्यासाठी बंदी घातलेल्या मानवी औषधांची राजरोसपणे होत असलेली विक्री

**(१) * १८३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न व औषधि द्रव्ये मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यासह राज्यामध्ये गेल्या ३ ते ४ वर्षापासून शासनाचे आदेश धूडकावून अनेक औषध दुकानातून देशामध्ये विक्री करण्यासाठी बंदी घातलेल्या मानवी औषधांची राजरोसपणे विक्री होत असल्याचे दिनांक 10 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमरास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून मात्र अशी औषधे विकणा-यावर कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीअती बंदी घातलेल्या औषधांची सर्रास विक्री करण्या-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (1) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

औषध नियंत्रक, भारत सरकार यांचेकडून औषधांवर बंदी घालण्यात आली असल्याची प्राप्त होताच अन्न व औषध प्रशासनातर्फे त्या अनुषंगाने त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विभागीय व जिल्हा कार्यालयास देण्यात येतात. तसेच प्रतिबंधित औषधांचा साठा आढळल्यास औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चोपडा (जि.जळगांव) शहरातील पोलीस निवासस्थानाच्या गैरसोयीबाबत**

**(२) * २३११ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) चोपडा (जि.जळगांव) शहरातील शहर ग्रामीण व उपविभागीय या तिन्ही पोलीस कार्यालयात कार्यरत असलेल्या पोलीस/अधिकारी यांच्या निवासस्थानाच्या इमारतीमध्ये पाण्याची गळती, फुटकी कौले, सांडपाण्याचे फुटके पाईप, घाणीचे साम्राज्य, काटेरी झुडपी व गवत इत्यादी गैरसोयी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिका-यांकडे पोलीसांनी वारंवार तक्रारी करुनही अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर पोलीसांच्या निवासस्थानांची दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2) होय हे खरे आहे.

(3) चोपडा, जि. जळगांव येथील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांकरीता बांधण्यात आलेली निवासस्थाने सुमारे 100 वर्षापुर्वीची असून, त्यांची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाचोरा-भडगांव (जि. जळगांव ) तालुक्यातील महावितरण कंपनीकडून**
**शेती पंपासाठी लागणारे ट्रान्सफार्मर उशिराने मिळत असल्याबाबत**

**(३) * १३४४ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पाचोरा-भडगांव (जि. जळगांव ) तालुक्यातील महावितरण कंपनीकडून शेती पंपासाठी लागणारे ट्रान्सफार्मर एक ते दिड महिना उशिराने मिळतात,त्यामुळे शेतक-याचे नुकसान झाले असून या संदर्भात महावितरण कंपनीकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी गेल्या 6 महिन्यात अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय, ,

(2) असल्यास,नुकसान भरपाई मिळण्याबाबत तसेच शेतक-यांना ट्रान्सफार्मर वेळेवर उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच नुकसानीस जबाबदार अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(3) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे अशंत: खरे आहे, माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, 2014 या दरम्यान अनाधिकृत विज वापरामुळे काही ठिकाणी विद्युत रोहित्र नादुरुस्त झाले होते व त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून नादुरुस्त झालेले रोहित्र साधारणत: एक ते दिड महिना विलंबाने बदलवून मिळत आहेत या आशयाच्या तक्रारी महावितरण च्या स्थानिक कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या होत्या.
(२) अनाधिकृत वीज वापर वाढल्यामुळे रोहित्र नादुरुस्त होण्याचे प्रमाण इतके वाढले कि ते दुरुस्त होणाऱ्या रोहित्राच्या संख्येपेक्षा जास्त होते, तथापि नादुरुस्त रोहित्र तातडीने बदलण्याच्या दृष्टीने सदर भागात नवीन रोहित्र उपलब्ध करुन देणे, रोहित्र दुरुस्त करण्याऱ्या कंत्राटदारांकडून तातडीने रोहित्र दुरुस्त करण्याचे निर्देश देऊन त्याची उपलब्धता वाढवणे व ज्या परिमंडळात रोहित्र नादुरुस्तीचे प्रमाण जास्त आहे तिथे इतर परिमंडळात उपलब्ध असेलली नवीन व दुरुस्त रोहित्राचा तातडीने पुरवठा करणे, या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्हयात पिण्याच्या पाण्याची करण्यात आलेली कपात

**(४) * ३५५१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे जिल्हयात माहे नोव्हेंबर, 2014 वा त्यासुमारास पिण्याच्या पाण्याची कपात केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यामुळे आधीच पाणी कपात असून त्यातच या पाणी कपातीमुळे तसेच पाईपलाईन फुटण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने भिवंडीकरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, ही पाणी टंचाई दूर करण्याकरिता महापालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर** : (१) होय, हे खरे आहे.
ठाणे लघुपाटबंधारे विभागामार्फत सन २०१४-१५ या वर्षाकरिता उल्हास नदी पाणी नियोजनात दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ ते दिनांक १५ जुलै, २०१५ या कालावधीमध्ये १४ टक्के पाणीसाठ्यात तुट असल्याने कपात लागु करण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे अशंत: खरे आहे.
तथापि १४ टक्के पाणीसाठ्यात तुट असल्याने कपात लागू करण्यात आल्याबाबत वर्तमानपत्रात, केबलद्वारे व दवंडीद्वारे नागरिकांना माहिती देण्यात येते. या कपातीमुळे पाणी टंचाई असलेल्या भागामध्ये नागरिकांच्या मागणी नुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु, पाईपलाईन फुटण्याच्या घटना निदर्शनास आल्या नाहीत व त्यामुळे पाणी टंचाई निर्माण झालेली नाही.

-----------------

## मुंबईत मुलांना खेळण्याकरिता मैदाने उपलब्ध करण्याबाबत

**(५) * १८२५ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईत मुबलक प्रमाणात मैदाने असल्याचा दावा महानगरपालिका करीत असली तरीही आजही मुंबईत अनेक ठिकाणी मुले आपला जीव धोक्यात घालून रस्त्यावर खेळतांना दिसत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त कारणास्तव मागील दोन वर्षात रस्त्यावर अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे वास्तविक महानगरपालिकेने तसेच शासनाने क्रीडासंकुले बांधली आहेत परंतू त्यांचे शुल्क गरीब वर्गातील मुलांना परवडणारे नसल्याने ते नाईलाजास्तव रस्त्यावर खेळून आपला जीव धोक्यात घालतात हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(3) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबईच्या प्रत्येक विभागात खेळाची मैदाने असून या मैदानांमध्ये मुलांना खेळण्यासाठी सोयी-सुविधा जसे-ओपन जीम अपारेट्स, बहुउद्देशीय प्रकारची खेळण्याची उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत व त्याचा पुरेपूर वापर स्थानिक मुले करीत आहेत.
(२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दोन क्रिडा संकुले बांधली आहेत आणि त्याचे शुल्क रास्त व वाजवी आहेत. शाळेतील गरीब मुलांना याच शुल्कामध्ये सुट दिली जाते.

शासनाने राज्यातील क्रिडा विकासाकरिता महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलमेंट प्लॅन अतंर्गत राज्यातील प्रत्येक विभागीय मुख्यालय, जिल्हा व तालुक्याचे ठिकाणी क्रिडा संकुल निर्मितीचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने मुंबईतील धारावी येथे जिल्हा क्रिडा संकुलाचे काम सन २०१३ मध्येच पूर्ण करण्यात आलेले आहे. या क्रिडा संकुलातील क्रिडा सुविधा सर्वसामान्यांकरिता व खेळाडू विद्यार्थ्यांकरिता अत्यल्प दरात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. शासनाच्या क्रिडा मार्गदर्शकांकडून या ठिकाणी मोफत क्रिडा प्रशिक्षण देखील देण्यात येते. त्याचप्रमाणे मुंबईतील एकूण २१ वॉर्ड व अधेंरी, कुर्ला व बोरीवली या तीन तालुक्यांचे ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण २४ क्रिडा संकुले निर्माण करण्यास देखील शासनाने मान्यता दिलेली आहे.
(३) प्रश्‍न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सौरऊर्जा निर्मितीस चालना मिळण्याकरीता तातडीने कार्यवाही करण्याबाबत**

**(६) * ४१२१ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्याने अपारंपारिक ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत प्रगती केली असली तरी सौरऊर्जा निर्मितीत इतर राज्यांच्या तुलनेत राज्य पिछाडीवर असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, राज्याची सौरऊर्जा निर्मितीत प्रगती होण्याकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (1) नाही, हे खरे आहे.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर सिव्हील हॉस्पीटल मधील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे दोघांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(७) * २७७२ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर सिव्हील हॉस्पीटलमध्ये श्वेता शिकरे व अनिल उर्फ अण्णप्पा निलप्पा बिराजदार या दोघांचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याने सिव्हील हॉस्पीटल समोर स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध संघटनेकडून माहे सप्टेंबर, 2014 मध्ये आदोंलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) मयत रुग्ण श्रीमती श्वेता शिखरे यांच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करण्याकरीता संस्था स्तरावर दिनांक ५.११.२०१४ च्या पत्रान्वये समिती गठीत करण्यात आली होती. समितीच्या निष्कर्षनुसार उपचारात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाले असल्याचा निष्कर्ष निघत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अचलपूर व चांदुरबाजार (जि.अमरावती) या तालुक्यांमधील वीजविषयक समस्या सोडविण्याबाबत**

**(८) * ३६४३ श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) अचलपूर व चांदुरबाजार (जि.अमरावती) या तालुक्यातील विजेची समस्या सोडविण्यात यावी या मागणीसाठी दिनांक 11ऑगस्ट, 2014 पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा लोकप्रतिनिधीनी तत्कालीन मा.राज्यमंत्री, ऊर्जा यांना दिनांक 25 जुलै, 2014 रोजी दिलेला होता, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर आदोंलनातील मागण्यासंदर्भात मा.राज्यमंत्री, ऊर्जा यांनी दिनांक 5 ऑगस्ट, 2014 रोजी बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर बैठकीत मागण्यासंदर्भात झालेल्या निर्णयाची अद्यापपर्यंत अमंलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, त्याची कारणे काय आहे आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) होय, सदर बैठक दिनांक ०६ ऑगस्ट, २०१४ रोजी घेण्यात आली होती.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पानशेत व वरसगांव (जि.पुणे) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत**

**(९) * ३४९८ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पानशेत व वरसगांव धरणग्रस्तांचे दौंड तालुक्यात पुर्नवसन झाले असून या धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत दिनांक 29 ऑगस्ट, 2006 रोजी तत्कालिन महसूल राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली स्थानिक लोकप्रतिनिधी व धरणग्रस्तांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत बैठक झाली आहे, हे खरे आहे काय तसेच या बैठकीच्या इतिवृत्तास शासनाने क्र.आरपीओ 3504/प्र.क्र.78/र-4 महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक 5 ऑक्टोबर, 2006 अन्वये मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या बैठकीतील घेतलेल्या निर्णयानुसार प्रकल्पाग्रस्तांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणती निर्णय घेतला आहे,
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधीत दौंड तालुक्यात पुनर्वसन झालेल्या या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत शासन निर्णय घेणे अपेक्षीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरील २९/८/२००६ बैठकीत घेण्यात आलेल्या व दिनांक ५/१०/२००६ च्या इतिवृत्तानुसार कायम करण्यात आलेल्या बहुतांश निर्णयावरील कार्यवाही पुर्ण झाली असून उर्वरित अशंत: कार्यवाही झालेल्या निर्णयांवरील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही .

-----------------

**हिंगोली जिल्हयात भूगर्भातील पाण्याची पातळी अतिशय खोल गेल्याबाबत**

**(१०) * २६९१ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) हिंगोली जिल्हयात या वर्षी पावसाचे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी अतिशय खोल जाऊन पिण्याचे पाणी व जनावरांचा चारा टंचाईची स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या संदर्भात शासनाने आढावा घेतला आहे काय,
(3) असल्यास, उन्हाळयातील संभाव्य पाणी टंचाई व जनावरांचा चारा टंचाईबाबत शासनाने तातडीने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हिंगोली जिल्हयात सन 2014 च्या खरीप-हंगामामध्ये सरासरीच्या 52% इतके पर्जन्यमान झाले असल्याने पाणी व चारा टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय.
(2) होय.
(3) संभाव्य पाणी टंचाई विचारात घेऊन धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले असून पाणी व चारा टंचाई कृती आराखडा तयार करुन त्याची अमंलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील 454 गांवामध्ये फ्लोरोईडयुक्त पाणी असल्याबाबत**

**(११) * ३९७६ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) यवतमाळ जिल्ह्यातील आर्णी, बाभूळगांव, दारव्हा, दिग्रस, घाटंजी, कळंब, महागांव, मारेगांव, नेर, पांढरकवडा, पुसद, राळेगांव, उमरखेड, वणी, यवतमाळ आणि झरी जामणी या तालुक्यांमध्ये फ्लोरोसीसचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील साधारणत: 377 लोकांना दाताचा फ्लोरीसीस आणि 83 जणांना हाडाचा फ्लोरोसीस ह्या आजाराची लागण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, फ्लोराईडमुक्त पाणी देण्याबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**डॉ. दीपक सावंत :** १) हे खरे आहे.
२) हे खरे आहे.
३) जिल्ह्यातील सन २००१ च्या सर्वेक्षणानुसार ४५४ गांवातील काही स्त्रोतांचे फलोरोईडचे लागण होऊ नये म्हणून शासनाने तातडीने दुषित पाणी पिण्यास मनाई करणारे फलक लावलेले आहेत. फेब्रुवारी, २०१३ पर्यंत ४२३ गावात पाणी पुरवठा योजनेंअतंर्गत इतर स्त्रोतांमार्फत पुरेसे पाणी उपलब्ध असल्याने उर्वरित ३१ गावे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या कृती आराखड्यात घेण्यात आली आहेत. त्यापैकी २२ गावामध्ये योजनेची कामे सुरु आहे. ९ योजना सन २०१४-१५ मध्ये मंजूर आहेत.
४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**वसई (जि.ठाणे )तालुक्यातील ६९ गावांसाठीच्या ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनेबाबत**

**(१२) * १८५६ श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.ठाणे )तालुक्यातील ६९ गावांसाठी ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनेच्या कामाला शासनाची मंजूरी मिळून १० वर्षापूर्वी सुरुवात झाली असून योजना पूर्ण करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अशंत: खरे आहे.
वसई विरार उप प्रोदशिक पाणी पुरवठा टप्पा - 2 भाग-2 या योजनेस दिनांक 24.5.2005 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. योजनेच्या कामास 6 वर्षापूर्वी सुरुवात झाली असून डिसेंबर, 2008 व मार्च, 2010 मध्ये योजनेची कामे टप्प्या-टप्प्याने हाती घेण्यात आली.
(२) भौतिकदृष्टया योजनेचे काम 98 टक्के पूर्ण झाले आहे. वसई विरार महानगरपालिकेने आवश्यक जल जोडण्याद्वारे पाणी उपलब्ध करुन न दिल्यामुळे योजना कार्यान्वित करण्यात आली नाही.

(३) सदर योजनेसाठी वसई विरार महानगरपालिकेकडून आवश्यक जल जोडण्या प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यांच्या कालावधीत टप्प्या-टप्प्याने पाणी पुरवठा सुरु करण्यात येईल.

-----------------

**मिरजोळे(जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यांतून होणारे प्रदूषण**

**(१३) * ३१६२ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मिरजोळे(जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यांतून होणारे प्रदूषण, सांडपाण्यावर योग्य प्रकारे प्रक्रीया न केल्यामुळे परिसरामध्ये पसरलेली प्रचंड दुर्गंधी यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत जिल्हा परिषद स्थायी समिती बैठकीमध्ये स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधीना सदर भागाला अचानक भेट दिली असता तक्रारीत तथ्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचे अहवालानुसार हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. स्थानिक लोकप्रतिनिधीनी सदर भागाला अचानक भेट दिली असता मत्स्य प्रक्रिया करतांना येणारा वास जाणवत होता.
(३) परिसरातील दुर्गंधीस जबाबदार असलेल्या संबंधित मत्स्यप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना समजपत्र देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमली पदार्थाच्या तस्करीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत**

**(१४) * १२०६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1)राज्यात अमंली पदार्थाच्या तस्करीवर धडक कारवाई करुन गेल्यावर्षाच्या तुलनेत या वर्षी दखल झालेले गुन्हे, हस्तगत अमंली पदार्थ आणि अटक केलेले आरोपी यामध्ये अनेक पटीने वाढ झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2)असल्यास,अमंली पदार्थाचे सेवन करणा-या मुंबईतील रिझवी व नॅशनल महाविद्यालयातील तिघा विद्यार्थ्यांना खार पोलिसांनी अटक केल्यानंतर सदरहू माहिती पुढे आली असून 300 रुपयांना दहा ग्रॅम मिळणा-या मेथ या नव्या अमंली पदार्थाचा नशा येण्यासाठी सदरहू विद्यार्थी मोठ्या प्रमाणात वापर करीत असल्याबाबत शासन आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(3)तसेच हे अमंली पदार्थ सर्रासपणे खुल्या बाजारात विकले जात असल्याच्या अनेक घटना निदर्शनास येत असून यात तरुणवयोगटातील मुलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, अशा अमंलीपदार्थावर कायमस्वरुपी बंदी घालण्यासाठी व अमंली पदार्थांच्या तस्करांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मेथ या नावाचा अमंली पदार्थ बाजारामध्ये विक्री होत आहे तो मेथ (मेथ ॲम्फेटामाईन) नसून मेफेड्रॉन (४ मिथाईल मेथ कॅथिलॉन) हा पदार्थ विकला जात आहे. सदर मेफेड्रॉनचा अतंर्भाव अद्याप अमंली पदार्थ विरोधी अधिनियम, 1985 च्या सूचीमध्ये करण्यात आलेला नाही. त्याचा अतंर्भाव होण्याकरिता शासनाने नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो, नवी दिल्ली यांना शिफारस केलेली आहे.
(३) तरूण वर्ग अमंली पदार्थाच्या व्यसनास बळी पडत असल्याची बाब खरी असली तरीदेखील पोलीस पातळीवर तसेच अमंली पदार्थ विरोधी कक्षाकडून अमंली पदार्थाच्या व्यवसायाशी निगडीत इसमावर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(४) व (५) सदर मेफेड्रॉनचा अतंर्भाव अद्याप अमंली पदार्थ विरोधी अधिनियम, 1985 च्या सूचीमध्ये करण्यात आलेला नाही. त्याचा अतंर्भाव होण्याकरिता शासनाने नारकोटिक्स कंट्रोल ब्यूरो, नवी दिल्ली यांना शिफारस केलेली आहे. महविद्यालये, जनमानसात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत करण्यात येत आहेत. तसेच अमंली पदार्थामुळे शरीरावर होणाऱ्या परिणामांबाबत पोष्टरची प्रदर्शने महाविद्यालये, झोपडीपट्टी परिसरात, रेल्वे स्थानकांजवळ हँड बिले वाटून जनजागृहतीचे काम करण्यात येत आहे. मुंबई पोलीसांमार्फत ड्रग्ज फ्री कॅम्पस ही मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. यात शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा व अध्यापकांचा समावेश असल्याने अमंली पदार्थाच्या व्यसनांवर नियंत्रण आणण्यासाठी हातभार लागत आहे. तसेच एन.जी.ओ.मार्फत अमंली पदार्थाच्या सेवनांपासून परावृत्त करण्यासाठी औषधोपराचही करण्यात येत आहे. जनजागृतीची मोहीम हाती घेतली असताना समांतरपणे अमंली पदार्थाच्या तस्करांवर एन.डी.पी.एस.कायद्यांमधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील गुरुकुल या निवासी शाळेतील तीन विद्यार्थ्यांचे मृतदेह शाळेच्या मागील नाल्यात आढळल्याबाबत**

**(१५) * २१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.असलम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या गुरुकुल या निवासी शाळेतील तीन विद्यार्थ्यांचे दिनांक 27 ऑगस्ट, 2014 रोजी वा त्या सुमारास शाळेच्या मागील नाल्यात मृत्युदेह आढळून आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकणाची चौकशी करण्यात आली आहे,
(3) असल्यास, चौकशीत काय आळढून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील आरोपीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) होय.
(2) व (3) या प्रकरणी विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि क्रमांक ४०६/२०१४ भादंवि कलम ३२४,३४ सह बाल न्याय अधिनियम २००० चे कलम २३ अन्वये गुन्हा दाखल

केलेला आहे. चौकशीमध्ये सदर निवासी शाळेतून सदर विदयार्थी पळून जात असतांना काळोखामध्ये सुक नदीच्या पात्रातील पाण्याचा अदांज न आल्याने नदीच्या पात्रातील पाण्याचा अदांज न आल्यान नदीच्या पाणयातीली पात्रात पडून मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अहवाल व केमीकल तपासणी अहवाल इत्यादी प्राप्त पुराव्या वरुन निष्पन्न झाले आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांना त्यांचे दोन शिक्षक सतत मारहाण करत असल्याने सदर आरोपी शिक्षकांविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील छत्रपती संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेत विकासकाने करारभंग केल्याबाबत

**(१६) * ३४९७ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील स्वामी नित्यानंद मार्गावरील छत्रपती संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून आर.टी.कन्स्ट्रक्शन या विकासकाकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर विकासकाने केलेल्या करारातील अटीनुसार अद्याप काही इमारतीना बालवाडी व कार्यालये दिलेली नाहीत, करारानुसार 3 हजार चौ.फुट क्षेत्रफळाचा हॉल देण्याऐवजी केवळ 2200 चौ.फुट हॉल दिला असून खेळाचे मैदान, उद्यान व इतर सुविधा दिलेल्या नसल्याने तेथील रहिवाशांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, विकासकाने करारातील ब-याच अटीची पुर्तता न केल्यामुळे इमारतीना पूर्ण भोगवटा पत्र अद्याप प्राप्त झालेले नाही तसेच विकासकाने विद्युत, पाणी, मालमत्ता इत्यादीची आकारणी भरली नसल्यामुळे तेथील वीज, जलजोडणी इ. खंडीत करण्याची कारवाई संबंधितांकडून करण्याबाबतच्या नोटीसा येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकल्पातील रहिवाशांनी याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे लेखी पत्रव्यवहार करुनही शासनाकडून मध्यस्थी करुन विकासकाला अद्यापही कोणतेही निदेश प्राप्त न झाल्याने तेथील रहिवाशी दिशाहिन झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, तेथील रहिवाशांना दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत एकूण १३४२ पात्र निवासी व अनिवासी झोपडीधारक आहेत. त्यास अनूसरून बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील विनियम ३३(१०) च्या परिशिष्ट-IV खंडीका ८.१ च्या तरतूदीनुसार प्रती १०० सदनिकामागे १ बालवाडी, १ संस्थेने कार्यालय अनुज्ञेय आहे. या योजनेत ८ पुनर्वसन इमारती व १ संयुक्त इमारत असून या सर्व इमारतीमध्ये एकूण १४ बालवाड्या व १४ संस्थेची कार्यालये बांधण्यात आली आहेत. तसेच या योजनेत झोपडीधारकांच्या संख्येनुसार अनुज्ञेय असलेली १४ समाज कल्याण केंद्र (एकूण क्षेत्रफळ ३,१५० चौ.फुट चटईक्षेत्र) बांधण्यात आली आहेत.

तसेच या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या मंजूर अभिन्यासामधील मनोरंजनाच्या मैदानाकरीता आरक्षित असलेल्या एकूण क्षेत्रापैकी झोपडपट्टी विरहीत क्षेत्राच्या ४९६.८३

चौ.मी.क्षत्राच्या १०० टक्के व झोपडपट्टी व्याप्त ४८८७.७६ चौ.मी.क्षत्राच्या ३३ टक्के म्हणजेच १६१२.९७ चौ.मी असे एकूण २१०९.८० चौ.मी. मनोरंजानाचे मैदान, त्याचप्रमाणे झोपडपट्टीव्याप्त `क्षत्रावरील २५३.७० चौ.मी. `क्षत्राच्या १०० टक्के खेळाचे मैदान व १०६५.२५ चौ.मी. `क्षत्रफळावर प्राथमिक शाळेचे बांधकाम महानगरपालिकेच्या मंजूर आराखड्यानुसार प्रस्तावित असून ते विकसीत करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील विनियम ३३ (१०) परिशिष्ट-IV च्या खंड ६.२० नुसार ११७६.१० चौ.मी.ले आऊट सुविधा`क्षत्र देखील या सहकारी गृहनिर्माण संस्थेस उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

(३) छत्रपती संभाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मंजूर अभिन्यासानुसार या योजनेत ८ पुनर्वसन व १ संयुक्त इमारतीना दिनांक ३.२.२०११ रोजी अशंत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ९.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विकासकास पुनर्वसन घटक इमारतीना पुर्ण भोगवटा प्रमाणपत्र घेण्याबाबत कळविले आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या ३३ (१०) परिशिष्ट-४ पोट कलम ९.१ व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.२३ दिनांक २०.११.१९९८ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन सदनिका, बालवाडी व समाज मंदिरे याकरीता इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वी प्रत्येकी रुपये २०,०००/- प्रमाणे रक्कम प्राधिकरणाकडे भरणे आवश्यक आहे व त्या रकमेवरील प्राप्त होणाऱ्या व्याजातून पुनर्वसन सदनिकांच्या देखभाल व कराचा बोजा भागविले अभिप्रेत आहे. त्यानुसार विकासकाने या योजनेतील इमारतीना दिनांक ३/२/२०११ रोजी भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वी देखभाल व दुरुस्तीची रक्कम रु.२,५६,६६,३५०/- इतकी रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे भरलेली आहे व त्या रकमेवरील रु.१,१४,३०,२४४/- इतकी व्याजाची रक्कम या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या लेखी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा आहे. संबंधित गृहनिर्माण संस्थेच्या बँक खात्यावर व्याजाची रक्कम जमा होण्यासाठी आवश्यक असलेला "ए फॉर्म" झोपडपटी पुनर्वसन प्राधिकरणाकडे अद्याप त्या संस्थेने दिलेला नसल्यामुळे संस्थेच्या बँक खात्यावर व्याजाची रक्कम अद्याप वर्ग झालेली नाही. परिणामी सहकारी गृहनिर्माण संस्थेस विदयुत, पाणी व मालमत्ता कराची देयके भरता येत नसल्याची शक्यता आहे.

(४) सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विविध अडचणीबाबत सन्मामनीय सदस्य व स्थानिक रहिवाश्यांनी दिनांक २७.१.२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपटी पुनर्वसन प्राधिकरण यांची भेट घेतली, त्यावेळी स्थानिक रहिवाशांनी सांगितलेल्या विविध अडचणीबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकासकाकडून दिनांक २९.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागविला आहे. तसेच या सहकारी गृहनिर्माण संस्थेस देखभाल व दुरुस्तीची रक्कम त्या संस्थेच्या बँक खात्यावर जमा होण्याकरीता "ए फॉर्म" भरुन देण्याबाबत प्राधिकरणाने दिनांक ९.१२.२०१४ राजीच्या पत्रान्वये त्या संस्थेस कळविले आहे.

(५) वरीलप्रमाणे.

-----------------

**रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील नेरळ माथेरान घाट रस्त्यावर बससेवा बंद असल्याबाबत.**

**(१७) * ८३३ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :**

सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यातील नेरळ माथेरान घाट रस्त्यावर बससेवा बंद झाल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास बससेवा बंद झाल्याने विद्यार्थी, नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी उपोषण केले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (1) होय, अशंत: खरे आहे.

दि. 02.11.2014 ते दि. 10.11.2014 या कालावधीत नेरळ ते माथेरान या मार्गावर राज्य परिवहन महामंडळाची बस सेवा काही तांत्रिक कारणास्तव बंद होता. परंतू सद्यस्थितीमध्ये सदर मार्गावर बसेस सुरु आहेत.
(2) हे खरे आहे.
(3) नेरळ ते माथेरान या मार्गावर बसेस चालविणा-या राज्य परिवहन महामंडळाच्या कर्जत आगारास 5 अतिरिक्त बसेस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये नेरळ ते माथेरान या मार्गावर दैनंदन ०५.१५, ८.१५, ११.३०, १४.१५ व १६.४५ या वेळेत जाता/येता १० फे-या चालवून प्रवाशांची वाहतूक केली जाते.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगलूर राष्ट्रीय महामार्गावर खंडाळा पारगाव जवळ कंटेनर उलटून झालेला अपघात

**(१८) * १३६२ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पुणे-बंगलूर राष्ट्रीय महामार्गावर पुण्याकडे जाताना खंडाळा पारगाव जवळ दिनांक 16 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास उड्डाणपूलावरुन उतरताना कंटेनर रस्त्यावर उलटून दुर्घटनेत 8 प्रवासी चिरडून ठार झाले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशी काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?
(4)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) पोलीसांनी केलेल्या तपासात कंटेनर चालकाच्या निष्काळजीपणामुळे सदर अपघात घडल्याने निष्पन झाले आहे. आरोपी कंटेवर चालकाविरुध्द खंडाला पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१८१/२०१४ नुसार भा.दं.वि.सं. कलम २७९, ३०४, ४२७ सह मो.वा.का.कलम१८४, १३४/१८७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस दि.१६.११.२०१४ रोजी अटक करण्यात आली असून प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना 2 व 3 मधील सर्वेक्षणातील गैरव्यवहार

**(१९) * ३३५० श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :**
सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नाशिक जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना 2 व 3 मधील सर्वेक्षणातील गैरव्यवहाराबाबत दिनांक 9 ऑगस्ट, 2014 रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर तक्रारीची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे यांचे मार्फत प्राथमिक चौकशी सुरु आहे.
(३) चौकशी सुरु असल्याने अद्याप पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राहता, (जि. अहमदनगर) येथे जाहीर सभेत शेतकऱ्यांवर झालेल्या लाठीमाराबाबत**

**(२०) * ७७३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) राहता (जि. अहमदनगर) येथे फळे, भालीपाला निर्यात सुविधा आणि प्रक्रिया केंद्र यांच्या उदघाटन प्रसंगी माजी मुख्यमंत्री यांच्या जाहीर सभेत कालवे पूर्ण करा आणि धरणाला निधी द्या अशा प्रकारची मागणी दिनांक १० ऑगस्ट, २०१४ रोजी उपस्थित शेतकऱ्यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा शेतकऱ्यांनी मागणी करताच या सभेमध्ये बसलेल्या शेतकऱ्यांवर पोलीसांनी बेदम लाठीमार करुन त्यांना फरफटत सभागृहाबाहेर काढले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या लाठी हल्ल्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि.१०.८.२०१४ रोजी खडकेवाके ता.राहता येथे तत्कालीन मुख्यमंत्री यांची सभा सुरु होण्यापूर्वी निळवंडे पाटपाणी कृती समितीच्या कार्यकर्त्यांनी निळवंडे धरणाचे पाणी आम्हाला मिळालेच पाहिजे नाहीतर सभा होऊ देणार नाही, अशी घोषणाबाजी केली होती.
(२) हे खरे नाही, उपरोक्त प्रसंगाच्या वेळी शांततेच्या मार्गाने ५ लोकांनी प्रतिनिधी स्वरुपात आल्यास मुख्यमंत्री यांची भेट घालून देवू असे त्यांना समजावून सांगण्यात आले. तथापि, ते एकण्याच्या मनस्थितीत नव्हते व ते इतरांना चिथावनी देऊ लागले. तसेच त्यांनी अचानक खुर्च्या फेकून पोलीसांना धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली. त्यावेळी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडू नये म्हणून त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिकार केल्यामुळे पोलीसांनी सौम्य बळाचा वापर करुन संबंधिताना ताब्यात घेतले.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे तालुक्यात (जि.धुळे) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(२१) * २३७ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) धुळे (जि.धुळे) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत नकली मजूर संख्या दाखवून खोटे दस्तऐवज तयार करुन रोहयोत मजुरांची खोट्या नावांची यादी बनवून गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक 4 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी 5 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचेवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या ग्रामरोजगार सेवक, दोन तत्कालीन ग्रामसेवक व दोन तत्कालीन सरपंच यांचे विरुध्द गु.र.नं. २९८ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधित जबाबदार दोन्ही ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळ,पूर्णा व रहानाळ (ता.भिंवडी, जि.ठाणे) भागातील गोदामात अवैधरित्या रासायनिक द्रव्य पदार्थाचा साठा असल्याबाबत**

**(२२) * २९०५ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यातील तळ,पूर्णा व रहानाळ भागातील गोदामात अवैधरित्या रासायनिक द्रव्य पदार्थाचा साठा असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, हे रसायन पदार्थ अतिशय घातक असल्याने अनेक वेळा आगी लागण्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, संबंधित विक्रेते या रायायनिक पदार्थाचा काळाबाजार करत असून यामध्ये विक्री प्रशासन व संबंधित प्रशासनातील अधिकारी यांचे संगनमत असून त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी एक घटना दि.३/४/२०१४ रोजी पूर्णा, ता.भिवंडी येथील जय श्रीराम कंपउडं या ठिकाणी घडल्याने सहायक पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) पोलिस आयुकत, ठाणे यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दि.१८/११/२०१४ रोजी केलेल्या पाहणी अती निखिल वेअर हाऊसमध्ये अशास्त्रीय पध्दतीने रासायनिक पदार्थाची साठवणूक केल्याचे आढळल्याने संबंधित गोडावूनधारकास सक्त ताकीद देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी, आग लागण्याच्या घटनेसंदर्भात संबंधित दोषीना अटक करण्याची कारवाई पोलिस आयुक्त, ठाणे यांचेमार्फत करण्यात आली असून आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट असल्याने त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(५)प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरात महत्वाची प्रतिजैविके व औषधीद्रव्यांचा होत असलेला तुटवडा**

**(२३) * २६३७ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई उपनगर जिल्ह्यातील शिवाजी नगर मानखुर्दच्या नागरी प्रभागात साथीच्या रोगांचे प्राबल्य वाढल्यामुळे तेथील नागरिकांना तातडीने काही महत्वाची प्रतिजैविके व औषधे उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी तेथील नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य), महासंचालक, (आरोग्यसेवा), महासंचालक, (आरोग्यसेवा मुंबई मंडळ), मुख्य आरोग्य अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्यसेवा) औषधीद्रव्ये नियंत्रणालयाकडे, मुंबई उपनियंत्रक औषधीद्रव्ये नियंत्रणालय, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(2)मुंबई शहरामध्ये साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले असले तरीही काही महत्वाची प्रतिजैविके व औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून त्यातील काही औषधे विक्रेत्यांकडून चढ्या किंमतीने विकली जात असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई उपनगर जिल्ह्यातील शिवाजीनगर मानखुर्दच्या नागरी प्रभागात साथीच्या रोगांचे प्राबल्य वाढल्यामुळे तेथील नागरीकांना तातडीने काही महत्वाची प्रतिजैविके व औषधे उपलब्ध करुन देण्याबाबतचे मागणीपत्र नगर विकास विभागाकडे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खात्यामध्ये माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये प्राप्त झालेले नाही.

(२) काही महत्वाची प्रतिजैविके व औषधांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला हे खरे नाही.

ह्युमन अलब्युमिन (Human Albumin) २०% आय.पी. या औषधाची विक्रेत्याकडून चढ्या किंमतीने विक्री केल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये आढळून आले हे खरे आहे. मे. नेक्सस लाईफकेअर प्रा. लि. या औषध विक्री पेढीने हेमाल्ब ह्युमन अलब्युमिन (Hemalb Human Albumin 20% I.P.) हे औषध एमआरपी किंमतीपेक्षा जास्त किंमतीत विकल्याचे आढळले.

(३) व (४) औषध विक्रेता मे. नेक्सस लाईफकेअर प्रा.लि. या पेढीचे परवाने रद्द करण्यात आले असून, औषध निरिक्षकाचा तपास तातडीने पूर्ण करुन सदर विक्रेत्याविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार आहे.

-----------------

**कोल्हापूर शहरातून वाहणारे जयंती व दुधाळी नाल्यातील प्रदुषीत पाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडण्याबाबत**

**(२४) * २०७७ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कोल्हापूर शहरातून सांडपाणी वाहणारे जयंती व दुधाळी नाले अडवून त्यातील प्रदुषित पाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणे गरजेचे असून. यातील पाणी, सांडपाणी प्रक्रिया केंद्राकडे नेऊन प्रकिय्रा करुनच नदीत सोडण्याचे आदेश शासनाने आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(2) असल्यास, हा आदेश धाब्यावर बसवून महानगरपालिकेची यंत्रणा प्रदुषित पाणी थेट नदीमध्ये सोडत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, प्रचंड दुर्गंधीयुक्त काळे पाणी थेट पंचगंगा नदीवरील नळ पाणी पुरवठा योजनामधून कोल्हापूर, शिरोली, इचलकरंजी या शहरातील लोकांना पिण्यासाठी वापरल्याने लोकांचे आरोग्य पूर्णपणे धोक्यात आले आहे, हे खरे आहे का,
(4) असल्यास, संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली, किंवा करण्यात येणार आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) होय
२) कोल्हापूर शहरातील जयंती नाला येथे बंधारा बांधण्यात आला असून त्यामध्ये फळया टाकून नाल्यामधील पाणी अडविले जाते, हे सांडपाणी पंम्पीगद्वारे सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडले जाते. पावसाळ्याच्या कालावधीत नदी व नाल्याला पुर येत असल्याने या प्रक्रियेची आवश्यकता नसते. पावसाळ्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात ही प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यात येते.

राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत जयंती नाला येथे नवीन पंप बसविणे पावसाळ्यामुळे शक्य झाले नाही. पावसाळा संपल्यानंतर दि.२९ ऑक्टोबर, २०१४ रोजी या नाल्यावर दोन पंप बसविण्यात आले व त्वरीत पंम्पीग सुरु करण्यात आले. त्यामुळे चालू वर्षी दि.२९ ऑक्टोबर पूर्वी जयंती नाल्यातून सांडपाणी वाहत होते. मात्र या दरम्यान सांडपाण्यावर ब्लीचिंग पावडरचा वापर करण्यात येत होता.

सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत दुधाळी नाल्यामधून वाहणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम ऑक्टोबर, २०१५ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. दरम्यान या नाल्यामधून वाहणा-या सांडपाण्यावर प्रदुषण महामंडळाच्या सुचनांनुसार कच्चा बंधारा बांधणे, कलोरिनचा डोस देणे, काही प्रमाणात सांडपाण्याचा वार शेतीसाठी करणे, इत्यादी उपाययोजना करण्यात येत आहेत.
३) व (४) सदर बाबीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांना तपासणी करुन त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

-----------------

**नेवाळे नाका परिसरात ( जि.ठाणे )येथे स्वस्त घरे देण्याचे आमिष दाखवून आकृति बांधकाम व्यवसायीकांनी गरजूंची फसवणूक केल्याबाबत**

**(२५) * ९८४ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नेवाळे नाका परिसरात (जि.ठाणे )येथे स्वस्त घरे देण्याचे आमिष दाखवून आकृति बिल्डरच्या तीन बांधकाम व्यावसायीकांनी तब्बल 820 गरजू लोकांची सुमारे 25 कोटी रुपये घेऊन फसवणूक केल्याची बाब माहे नोव्हेंबर, 2014 वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याने याबाबतचा गुन्हा महात्मा फुले पोलीस स्टेशन, कल्याण मध्ये नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित विकासकावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) कल्याण येथील आकृती बिल्डर्स ॲण्ड डेव्हल्पर्स आणि अन्य एका बांधकाम कंपनीने मौजे नेवाळे, ता.अबंरनाथ, जि.ठाणे येथील सर्व्हे नं.८२/६ व अस्तित्वात नसलेला सर्व्हे नं.९८/३ या जागेवर चाळीत घर बाुधुन देतो असे सागुन फिर्यादी व इतर ९३९ साक्षिदार यांच्याकडून वेळोवेळी घराच्या बुकींगसाठी चेकद्वारे व रोख रक्कमेद्वारे एकूण १५.७८ कोटी रुपयांची आर्थिक फावणूक केल्याबाबत महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, कल्याण येथे गुन्हा रजि. नं. ७७८/१४ भादंविसं कलम - ४२०, ४०६, ४४७, ४६५, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये १५ व्यक्ती विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उक्त नमूद गुन्ह्यांच्या तपासामध्ये सदरची जमीन संरक्षण मंत्रालय, भारत सरकाच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले आहे,

सदर गुन्ह्यांचे तपासकामी आकृती बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांची दोन कार्यालयाचे पंचनामा करुन सिल करण्यात आलेली आहेत, तसेच गुन्ह्याचे अनुषंगाने अपयुक्त कागदपत्रे देखील जप्त करण्यात अलेली आहेत. तसेच आरोपीतांचे नावे असलेले बँक खाती फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम १०२ प्रमाणे गोठविण्यात आले असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

## तुमसर तालुक्यातील पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करणेबाबत

**(२६) * ३५२१ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) रेंगेपार, बपेरा, सुकळी नकुल, गोंडीटोला देवरीदेव, पिपरीचुन्ही तामसवाडी, वांगी, पंजरा (ता.तुमसर, जि.भंडारा) या पुरग्रस्त गावाचे पुनर्वसन करण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) असल्यास, पुनर्वसनाच्या अभावी पुरबाधीत गावातील नागरिकांना जीवीत व वित्त हानीचा फटका सहन करावा लागतो, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, पुनर्वसनाच्या प्रक्रियेस विलंब होत असल्याने पुरबाधीत नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, शासनाने पुरग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) अद्यापपर्यंत उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) अशंत: खरे आहे
२) पुरबाधित गावांबाबत सन २०११ मध्ये केलेल्या पुररेषाच्या सर्वेक्षणामध्ये पूरग्रस्त प्राधान्य क्रमातील १२ गावामध्ये निळ्या रेषेच्या आंत घरे नसल्यामुळे पुनर्वसनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही. मात्र बावनथडी नदीच्या बदलत्या पात्रामुळे व नदीच्या पुराने नदीकाठ खचत असल्याने बपेरा या गांवातील पुरग्रस्तांना होऊ शकणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन पुनर्वसनासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात येऊन पुरग्रस्त पूनर्वसनतंर्गत मौजा बपेरा येथील बाधित १२५ पुरग्रस्तांकरिता घरकुलाचे बांधकाम करण्यात आलेले आहे.
३) सदर गावात पुरामुळे जिवीत हानी झालेली नाही. अतिवृष्टी काळातील नदीला आलेल्या पुराच्या पाण्यामुळे बाधीत कुटूंबाना तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात येवून पात्र लाभार्थ्यांना तात्काळ शासकीय अनुज्ञय मदत वाटप करण्यात येते. तसेच शेतपिकांच्या नुकसानी साठी पात्र शेतकऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे मदत वाटप करण्यात येते.
४)५) व ६)
सन २०११ मध्ये पूररेषाच्या फेर आखणीनुसार सदर गावातील घरे निळ्या पट्यांत येत नाहीत. मौजे रेंगेपार या गावातील ११ कुटूंबाच्या पुनर्वसनाची बाब विचाराधीन आहे.

-----------------

### भूम, परांडा, वाशी तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनीच्या नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत

**(२७) * ३९०४ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) भूम, परांडा, वाशी तालुक्यासाठी (जि.उस्मानाबाद) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनीकडून वॉरटीसह दिलेले ट्रान्सफार्मर सद्य:स्थितीत नादुरुस्त झाले असून त्यासंदर्भात तक्रार देऊनही अद्याप दुरुस्त करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अशंत: खरे आहे.
भूम, परांडा, वाशी तालुक्यामध्ये विविध योजने अतंर्गत उभारलेल्या दिनांक ०१.०४.२०१४ ते आजपर्यंत ४९ रोहित्रे हमी कालावधीमध्ये नादुरुस्त झालेले आहेत. परंतु सदरील रोहित्र माहवितरणकडील उपलब्ध रोहित्रामधून तात्डतोब बदलून देण्यात आले आहे.
(२) होय.
(३) सदरील नादुरुस्त रोहित्रे हमी कालावधीतील असल्याने ते विनामुल्य दुरुस्त करुन देण्याच्या सुचना संबंधित कंत्राटदारांस देण्यात आल्या आहेत. विहित कालावधीत रोहित्र दुरुस्त करुन न मिळाल्यास सदर रोहित्र कंत्राटदाराच्या जोखमीवर दुसऱ्याकडून दुरुस्त करुन घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील राजीव गांधी आरोग्य योजनेपासून लाभार्थी वंचीत असल्याबाबत**

**(२८) * १९१८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :**
सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या लोकांना चांगली आरोग्यसेवा मिळावी यासाठी शासनाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केलेली असतानाही ठाणे व पालघर जिल्हयातील २० लाख ३६ हजार २८३ गोरगरीब लाभार्थी अजूनही या योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने इन्शुरन्स कंपनीकडे यापूर्वीच सर्वांचा कोटयवधी रुपयांचा विमा आधीच भरला असून यासंदर्भात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी व इन्शुरन्स कंपनी याच्यात झालेल्या करारानुसार 20 लाख जणांचे इन्शुरन्सचे संपूर्ण पैसे भरुनही प्रत्यक्षात केवळ १६ हजार ६४ जणांचीच नोंदणी झालेली असल्यामुळे ठाणे व पालघर जिल्हयात शासकीय आरोग्य योजना अयशस्वी झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ,याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभ विनाविलंब उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** १) हे खरे नाही,
ठाणे व पालघर जिल्ह्यात रु.१ लाखापर्यंत उत्पन्न असलेले एकूण २०,५२,३४७ एवढे लाभार्थी असून त्यांच्या विमा भरण्यात आला आहे.

२) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ठाणे व पालघर जिल्ह्याचा समावेश करण्यात आला असून विमा कंपनीस एकूण २०,५२,३४७ लाभार्थ्यांचा विमा भरला आहे. या दोन जिल्ह्यात मान्यताप्राप्त रुग्णालयातून एकूण २४,५११ रुग्णांनी नोंदणी झाली असून १६,२९० रुग्णांना उपचारासाठी मंजूरी मिळाली आहे. त्यापैकी १५,६४१ रुग्णांनी शस्त्रक्रिया व उपचाराला लाभ घेतला आहे. ठाणे-पालघर जिल्हयातून रुग्ण दाखल करण्यास व नोंदणी करण्यास नकार देणे या संबंधात विविध माध्यमातून दोन तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यांचे निवारणही करण्यात आले आहे.

३) प्रश्न उद् भवत नाही.

४) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**तीथेक्षत्र औढा नागनाथ जि.हिंगोली येथील ग्रामीण रुग्णालयातील सुविधांबाबत**

**(२९) * १४६ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :**
सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1)तीथेक्षत्र औढा नागनाथ जि.हिंगोली येथील ग्रामीण रुग्णालयात एक्सरे मशीन, ईसीजी मशीन,रक्तपेढी,स्वतंत्र वीज यंत्रणा,पाणीपुरवठा इ. सुविधा नसल्याचे माहे ऑक्टोबर,2014 मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त रुग्णालयाची दुरावस्था दुर करुन सुसज्ज रुग्णालय करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (1) हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, औढा नागनाथ येथे एक्स-रे मशीन, इसीजी मशीन, स्वतंत्र विज यंत्रणा पाणी पुरवठा या सुविधा उपलब्ध आहेत. या रुगणालयात रक्तपेढी मंजुर नाही. येथील क्ष-किरण तंत्रज्ञाचे पद रिक्त असल्याने रुग्णांना जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे संदर्भित करण्यात येते. सदर रिक्त पद भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, हिंगोली व उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्यास्तरावर सुरु आहे.
(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### शाहूवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) शेतीपंपाना वीज कनेक्शन मिळण्याबाबत

**(३०) * १५०९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) .शाहूवाडी तालुक्यातील ( जि.कोल्हापूर) येथील 297 वीज ग्राहकांनी शेतीपंपाचे कनेक्शन मिळावे म्हणून महावितरण कंपनीकडे रक्कम भरलेली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर ग्राहकांना दोन वर्षानंतर कनेक्शन दिले जाईल अशा प्रकारची पत्रे महावितरणने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर कनेक्शन देणेसाठी आवश्यक असलेले जादा विजेचे खांब, डबल सर्कीट, नवीन ट्रान्सफॉर्मर इत्यादी कामे पूर्ण करणेसाठी महावितरण कंपनीकडे आर्थिक तरतुद नाही, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, सदर कामे तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अशंत: खरे आहे, शाहूवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील २३४ विजग्राहकांनी शेतीपंपाचे कनेक्शन मिळावे म्हणून महावितरण कंपनीकडे रक्कम भरलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) शेती पंपाच्या नवीन वीज जोडणीसाठी पैसे भरून प्रलंबीत असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी जादा विजेचे खांब, नवीन ट्रान्सफॉर्मर इत्यादी कामे महावितरणच्या इन्फ्रा-२ या योजनेतून करणेत येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### प्रकाशा-बॅरेज उपसा जलसिंचन योजना (ता.जि.नंदूरबार) या योजनेचे काम बंद असल्याबाबत

**(३१) * ८१७ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकाशा-बॅरेज उपसा जलसिंचन योजना (ता.जि.नंदूरबार) या योजनेला सन १९९९ मध्ये मंजूरी देण्यात आल्यानंतर तिचे काम दोन वर्षापूर्वी सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेमुळे नंदुरबार, साक्री आणि शिंदखेडा तालुक्यातील हजारो हेक्टर जमिनीला सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा लाभ होणार आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेचे काम गेल्या वर्षभरापासुन निधीअभावी बंद आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या महत्त्वाकांक्षी योजनेला निधी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) होय,
(2) प्रशासकिय मान्यता प्रकल्प अहवालानुसार खालील प्रमाणे `क्षत्र ओलीता खाली येणार आहे.
जिल्हा धुळे - ता. साक्री - १९४८ हेक्टर
जिल्हा धुळे - ता. शिंदखेडा - १७०८ हेक्टर
जिल्हा नंदुरबार - <u>ता. नंदुरबार - ३४२९ हेक्टर</u>
एकूण - ७०८५
(3) व (4) नाही.
योजनेस सन - २०१४-१५ आर्थिक वर्षाकरिता रु.८.३५७० कोटीचा तरतूद करण्यात आली आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**संकेतस्थळाच्या माध्यमातून नोकरीचे प्रलोभन दाखवून एका नायजेरियन व्यक्तीने अनेकांची फसवणूक केल्याबाबत.**

**(३२) * ४०७२ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) ओएलएक्स डॉट कॉम ही ऑनलाईन खरेदी - विक्रीसाठी प्रसिध्द असलेले संकेतस्थळ मात्र या संकेतस्थळाच्या माध्यमातून नोकरीचे प्रलोभन दाखवून एका नायजेरियन व्यक्तीने अनेकांना 16 लाखांहून अधिक रकमेचा गंडा घातल्याचा प्रकार आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास करण्यात आला आहे काय, त्यानुसार फसवणूकीसबंधी गुन्हेगारांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) व (2) होय.
दिनांक २६.९.२०१४ रोजी फिर्यादी नामे श्री. अभिलाश भास्कर तुट्टील यांचे तक्रारीवरुन बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्य पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १८४/१४, कलम ४२०,४६५,४६८,४७१,१२० (ब) भादंवि अन्वये रुपये ३६,२५०/- फसवणूक केलेबाबतचा गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपासामध्ये सदर गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा, कक्ष-४ मुंबई येथे गु.र.क्र ८५/१४, कलम ४२०,४६५,४६८,४७१,१२० (ब) भादंवि अन्वये सध्या चालू असून अद्यापपावेतो केलेल्या तपासामध्ये सदर गुन्हयात वापरलेले बँक खात्यामध्ये एकूण रुपये ४२,३७,४९१/- इतक्या रक्कमेची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे.

सदर गुन्ह्यामधील आरोपी हा नायजेरिअन नागरीक असून त्यास दिनांक १३.१०.२०१४ रोजी अटक करण्यात आली आहे. तो सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्याचेविरुध्द प्राप्त पुराव्या अन्वये मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोकण मर्कंटाईल बँकेच्या संगमेश्वर शाखेत पावणेतीन कोटीचा झालेला सोनेतारण गैरव्यवहार.**

**(३३) * १७०८ श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कोकण मर्कंटाईल बँकेच्या संगमेश्वर शाखेत पावणेतीन कोटी रुपयांचा सोनेतारण गैरव्यवहार झाल्याचे दि.16 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्याअनुषंगाने याप्रकरणी दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) व (2) होय.
(3) प्रकरणी संगमेश्वर पोलीस स्टेशन येथे दिनांक ४.१०.२०१४ रोजी गु.र.कं. ७५/२०१४ भा.दं.वि.सं. कलम ४२०,४०८,४६५,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
सदर गुन्ह्याप्रकरणी एकूण ३९ आरोपीपैकी ३१ आरोपीना अटक करण्यात आली असून, ७ आरोपीना अटक करणे बाकी आहे. एका आरोपीचा मृत्यू झालेला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**-जालना येथील लघुपाटबंधारे विभागातील शाखा अभियंता, व उप विभागीय अभियंत्यांनी बेहिशोबी संपत्ती जमा करुन केलेला गैरव्वहार.**

**(३४) * ३१५१ श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) जालना येथील लघुपाटबंधारे विभागातील शाखा अभियंता व उप विभागीय अभियंत्यांस लाचलुचपत प्रतिबंध विभागाने गैरव्यवहार करुन अडीच कोटीची बेहिशोबी संपत्ती जमा केल्याप्रकरणी माहे मे, 2014 मध्ये वा त्यादरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,
(2) तसेच पाटबंधारे विभागामार्फत संबंधित लाचखोर अभियंत्याच्या कार्यकाळात झालेल्या इतर कामाच्या गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, या उपरोक्त प्रकरणी संबंधित लाचखोर अभियंत्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) होय.
(2) श्री. यादव, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (जल संधारण विभाग), जालना यांनी सन २००६ मं २०१० या कालावधीत मानव विकास मिशन अतंर्गत परभणी जिल्हयातील जिंतूर व पालम तालुक्यात बांधण्यात आलेल्या सिमेंट नाला बांध व जलबांध या कामामध्ये एकूण रुपये ४४,२७१/- एवढे अति प्रदान केल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचेविरुध्द म.ना.से (शिस्त व अपील) नियम,१९७९ खाली विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(3) व (4) लोकप्रतिनिधीनी मा. लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांजकडे दिनांक ८ जून, २०१० रोजी केलेल्या तक्रारीबाबत लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अती खालील चार अधिका-यांविरुध्द लाचलूचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम १३(१) (ड) सह १३(२) व भा.दं.वि. कलम ४६७, ४६८,४७१,१०९,४०९,३४,१२०(ब) अन्वये पोलीस स्टेशन बदनापूर येथे गु.र.नं.९१/१४ व पोलीस स्टेशन टेंभूर्णी येथे गु.र.नं.३६/१४ दाखल करण्यात आला आहे.
१. श्री रघुवीर गणपतराव यादव, कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, औरंगाबाद
२. श्री भास्कर काशिनाथ जाधव, तात्कालीन उप विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे विभाग औरगांबाद,
३. श्री. श्रीनिवास बालाजी काळे, तत्कालीन शाखा अभियंता, लघु पाटबंधारे (जलसंधारण) उप-परभणी, जालना लघु पाटबंधारे अतंर्गत.
४. श्री. रामेश्वर अबांदास कोरडे, तत्कालीन शाखा अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, औरगांबाद.

उपरोक्त चारही आरोपीना दि. २.५.२०१४ रोजी अटक करण्यात आली होती ते सध्या जामिनावर आहेत. गुन्हयात नमूद आरोपीच्या राहते घराची झडती घेवून मालमत्तेची चौकशी केली असता अनुक्रमांक 2 व 3 येथील आरोपीबाबत ज्ञात स्त्रोतापेक्षा अधिक अपसंपदा निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७.१३ (१) (ई) सह १३(२) व भा.दं.वि. कलम १०९ अन्वये पोलीस स्टेशन, मुकुंदवाडी, औरंगाबाद शहर येथे अनुक्रमे गु.र.नं. ३०४०/२०१४ व गु.रनं. ३०३९/२०१४ दाखल करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे नमूद गुन्हयातील आरोपी श्री. यादरव श्री. कोरडे व श्री. काळे यांना दि.२८.५.२०१४ च्या आदेशान्वये पुर्वलक्षी प्रभावाने अटक केल्याच्या दिनांकापासून (दि.२.५.२०१४) शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. संबंधित आधिका-यांविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या स्तरावर विचारधीन आहे.

-----------------

## डोंबिवली (ठाणे) येथील औद्योगिक विभागातील प्रदुषित पाणी टँकरव्दारे भोपर या नाल्यात सोडण्यात येत असल्याबाबत

**(३५) * ९६८ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (ठाणे) येथील औद्योगिक विभागातील प्रदुषित पाणी टँकरव्दारे भोपर या नाल्यात सोडण्यात येत असल्याने परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे, या संदर्भात तक्रार केल्यास टँकरमाफिया परिसरातील नागरिकांना व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना त्रास देत असल्याचे प्रकार माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोपर नाल्यात सोडण्यात येत असलेले दुषित पाणी रोखण्याबाबत तसेच टँकरमाफियावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) डोंबिवली (ठाणे) येथील औद्योगिक विभागातील प्रदुषित पाणी टँकरद्वारे भोपर या नाल्यात सोडण्यात येत असल्याने परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. या संदर्भात तक्रार केल्यास टँकरमाफिया परिसरातील नागरिकांना व प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना त्रास देत असल्याचे प्रकार निदर्शनास आले नसल्याने हे खरे नाही.
(२) डोंबिवली औद्योगिक वसाहतीतील विनाप्रक्रियाकृत सांडपाणी थेट भोपर नाल्यात सोडण्यात येत नाही.
डोंबिवली औद्योगिक वसाहतीतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेद्वारे प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या बंदिस्त नलिकेद्वारे खंबाळपाडा नाला व भोपर नाल्याद्वारे उल्हास खाडीत सोडण्यात येते. तथापि, औद्योगिक वसाहतीच्या बाहेरील औद्योगिक सांडपाणी अनधिकृतपणे भोपर नाल्यामध्ये सोडण्याच्या घटनेचा तपास करण्यासाठी पोलीस उप आयुक्त, कल्याण विभाग यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**मुंबई येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात (राणीचा बाग) पशुपक्ष्यांची मागील 16 वर्षापासून बेकायदा विक्री करण्यात येत असल्याबाबत**

**(३६) * ६९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानात (राणीचा बाग) पशुपक्ष्यांची मागील 16 वर्षापासून बेकायदा विक्री करण्यात येत असतानाही संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पशुपक्ष्यांची बेकायदा होत असलेली विक्री त्वरीत थांबविण्याबाबत तसेच पशुपक्ष्यांची होत असलेल्या बेकायदा विक्रीकडे दुर्लक्ष करण्याऱ्या संबंधित विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयात (राणीचा बाग) पशुपक्ष्यांची मागील १६ वर्षापासून बेकायदा विक्री करण्यात येते, हे खरे नाही. तथापि याबाबत दि. ८ ऑक्टोबर, २०१४ रोजी मायव्हेटस चॅरिटेबल ट्रस्ट व रिसर्च सेंटर, नवी मुंबई या संस्थेने केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे लेखी तक्रार केली होती.
(२) केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून दि.१७ ऑक्टोबर, २०१४ रोजी सदर तक्रारी संबंधात सखोल चौकशी करण्याकरिता डॉ.पी.सी.त्यागी, (आय.एफ.एस.) प्रोफेसर एण्ड डेड ऑफ डिपार्टमेंट, कॅप्टीव्ह ब्रीडीग एण्ड झू मॅनेजमेंट सेल, वाईल्ड लाईफ इस्टीटयूट ऑफ इडिया, देहरादून व डॉ.ए.के.मल्होत्रा, वाईल्ड लाईफ

वॉर्डन, गाजियाबाद यांनी वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय येथे भेट दिली व त्यांनी ॲनिमल इन्व्हेंटरी रजिस्टर, मागील २० वर्षातील प्राण्यांच्या अदलाबदल प्रस्तावांची कागदपत्रे, जन्म-मृत्यू नोंदीची रजिस्टर्स इत्यादी संबंधित दस्तावेजाची तपासणी केली व सदर आरोपात काही तथ्य नसल्याचे मत प्रदर्शित केले. त्या अनुषंगाने त्यांनी सविस्तर अहवाल केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडे सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना**
**अन्नपूर्णा योजनेचे धान्य वितरीत न केल्याबाबत**

**(३७) * ३००१ श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना गेल्या अनेक महिन्यापासून अन्नपूर्णा योजने मार्फत मिळणारे धान्य वितरीत केले नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याची कारणे आहेत,
(3) असल्यास, सदर धान्य केव्हापर्यंत वितरीत करण्यात येणार आहे,
(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे नाही.
केंद्र शासनाने अद्याप माहे एप्रिल, 2014 पासूनच्या कालावधीचे अन्नपूर्णा योजनेचे नियतन मंजूर केलेले नाही. परंतू केंद्र शासनाने माहे एप्रिल, 2014 मध्ये माहे ऑक्टोबर, 2013 ते मार्च, 2014 या कालावधीकरिता मंजूर केलेल्या अन्नधान्याची उचल करुन व त्याआधीच्या कालावधीतील शिल्लक अन्नधान्य साठयातून माहे नोव्हेंबर, 2014 पर्यत अन्नपूर्णा योजनेअतंर्गत सोलापूर जिल्हातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप केले आहे.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागातील शाळांसाठी करण्यात**
**आलेल्या फळे खरेदीत 40 लाखाचा गैरव्यवहार झाल्याबाबत.**

**(३८) * ४१२९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागातील 33 शाळांसाठी फळे खरेदी करण्यात आलेल्या फळे खरेदीत 40 लाखाचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभागातील शाळांकरिता फळे खरेदी प्रकरणी गैरव्यवहार करण्यात आल्याचे ऑक्टोबर, २०१४ मध्ये किंवा त्या सुमारास निदर्शनास आलेले नाही.

तथापि, सन २०१० मध्ये महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक यांच्या लेखा ओक्षपानुसार मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विभागांतील शाळांमध्ये बसविण्यात आलेल्या हिरव्या रंगाच्या काचेच्या फळ्यांच्या (ग्रीन मॅग्नेटीक बोर्ड) खरेदी प्रकरणी नियमानुसार खर्च न झाल्याचे निदर्शनास आले.

(२) होय, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) व (४) चौकशीअती सदर प्रकरणात तथ्य असल्याचे निदर्शनास आले व सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने खालील कर्मचाऱ्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्यात येऊन त्यांना पुढीलप्रमाणे शिक्षा करण्यात आली आहे.

अ. श्री.दिलीप चिंतापण शिशुपाल, मुख्य लिपिक (लो.टि.म.स.रुग्णालय), तत्कालीन मुख्य लिपिक (शिक्षण विभाग)

शिक्षा- एक वार्षिक देय वेतनवाढ २ वर्षांसाठी कायमस्वरुपी कमी करण्यात आली.

ब. श्री.आबासाहेब कृष्णाची जाधव, शिक्षणाधिकारी (सेवानिवृत्त)

शिक्षा- मूळ निवृत्तीवेतन दोन वर्षासाठी रु. १०००/- ने कायमस्वरुपी कमी करण्यात आले.

क. श्री.पांडुरंग रुपा पाटील, उप शिक्षणाधिकारी (सेवानिवृत्त)

शिक्षा- मूळ निवृत्तीवेतन दोन वर्षासाठी रु.५००/- ने कायमस्वरुपी कमी करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (शहर) यांनी दिनांक ३.३.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार महापालिकेच्या वित्त शाखेसंबंधी प्राथमिक चौकशी प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## वाशी स्टेशनजवळच्या सेक्टर ३0 मधील भूखंड सिडकोने कोणतीही जाहिरात न देता रहेजा डेव्हलपर्सला दिल्याबाबत

**(३९) * ४०५९ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1)वाशी स्टेशनजवळील मोक्याच्या ठिकाणचे सेक्टर ३0 मधील भूखंडाचे सिडकोने मेसर्स के.रहेजा डेव्हलपर्सला सुमारे 10 वर्षापूर्वी केलेले वितरण मुंबई हायकोर्टाने दिनांक 21 नोव्हेंबर, 2014 रोजी रद्दबातल ठरवले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू वितरण हे बेकायदा असून घटनाबाहय आहे व ही मालमत्ता सहा महिन्यांच्या आत सिडकोच्या ताब्यात देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, त्यानुसार शासन उक्त भूखंड ताब्यात घेण्याप्रकरणी काय कार्यवाही करीत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2) व (3) मा. उच्च न्यायालयाने प्रश्नाधिन प्रकरणी दि. 21 नोव्हेंबर, 2014 रोजी न्यायालयात निकाल घोषित करुन मे.के.रहेजा कॉर्पोरेशन प्रा.लि. यांना सिडकोकडून करण्यात आलेले भूखंड वाटप बेकारयदेशीर ठरविले आहे. सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने घोषित केलेल्या निर्णयाची प्रत उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्याचे सिडको यांनी योजिले आहे. दरम्यान, या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या दि. २४/९/२०१४ रोजीच्या अतंरिम आदेशाच्या अनुषंगाने सिडकोकडून

कार्यवाही सुरु असून मे.के.रहेजा कॉर्पोरेशन प्रा.लि. यांना दि.११/११/२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस सिडकोकडून बजावण्यात आली आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे व पालघर जिल्हयातील शिरसाड-आबांडी रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(४०) * २७३३ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) ठाणे व पालघर जिल्हयातील शिरसाड-आबांडी येथील रस्त्यावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करीत असून सदरहू रस्त्यावर जागोजागी व रस्त्यांच्या दुर्तफा मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे तेथे वारंवार अपघात होत आहे,हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर रस्त्यावर तसेच रस्त्यांच्या दुर्तफा असलेल्या खड्ड्यापासून प्रवाशंयाना संरक्षण व सुरक्षा देण्यासाठी तेथील लोकप्रतिनिधीनी तसेच ग्रामस्थांनी मागील 2 वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाममंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, जिल्हाधिकारी- ठाणे, कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे ,हे ही खरेआहे काय,
(3) असल्यास, मागणीनुषंगाने सदरहू खड्डे बुजवून रस्त्याचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करुन रस्ता वाहतूकीस खुला होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर रस्ता बऱ्याच ठिकाणी सखल भागातून जातो. त्यामुळे आजूबाजूच्या डोंगराळ भागातील पावसाचे पाणी पावसाळ्यात रस्त्यावरुन जात असते. काही भागात अस्तित्वातील मोऱ्यांकडून पाण्याचा निचरा योग्य रितीने होत नाही. सध्या या रस्त्यावरील वाहतूक वाढल्याने तसेच अतिभाराच्या वाहतूकीमुळे पावसाळ्यात अस्तित्वातील रस्त्यांवर काही ठिकाणी खड्डे पडले होते हे खरे आहे. मात्र सदर रस्त्यावर वाहतूक सुस्थितीत ठेवण्यासाठी अश्या खड्डयाची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे.
(२) लोकप्रतिनिधीकडून यासंदर्भात निवेदन शासनाकडे प्राप्त झाले आहे.
(३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून शिरसाड ते अबांडी राज्य मार्ग क्र. ४० या रस्त्याची सुधारणा प्रगतिपथावर असून सदर रस्त्यावर वाहतूक सुस्थितीत ठेवण्यासाठी प्राधिकरणामार्फत काही ठिकाणी खराब झालेल्या रस्त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे व डांबरीकरणाचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आादिवासी नागरिकांना शासनाच्या अत्योदय**
**अन्न योजनेचा लाभ मिळतनसल्याबाबत**

**(४१) * २०३६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी नागरीकांना अत्योदय अन्न योजनेचे फायदे मिळाले नसून त्यासंदर्भातील न्यायालयाच्या आदेशांच अद्याप पालन न झाल्याने ,अन्न आणि नागरी पुरवठा

खात्याच्या सचिवांना माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास अवमानाची नोटीस बजावली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच आदिवासीची नावे अंत्योदय योजनेत नोंदविण्यासाठी मोहिम उघडा, त्यांच्या शिधापत्रिकांची पडताळणी करण्याचे काम रेशन दुकानदारांना न देता सरकारने नवे धोरण तयार करावे असे आदेशही खंडपीठाने दिले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होत असलेले व त्या अनुषंगाने राज्य शासनाने विविध योजनाअंतर्गत लाभार्थ्याकरिता देण्यात येत असलेले अन्नधान्याचे नियतन, उचल व वाटप याबाबतची माहिती शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली नसल्याने सदर माहिती विहित कालावधीत प्रदर्शित केली नसल्याने सदर माहिती विहीत कालावधीत प्रदर्शित न केल्यास अवमान याचिका दाखल का करण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखवा नोटीस सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिली होती. त्या अनुषंगाने माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये सादर माहिती शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालयाने सदर माहिती प्रदर्शित करण्यात आली असल्याबाबत समाधान व्यक्त केले आहे.
(2) होय.
(3) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशास अनुसरुन शासन निर्णय दि. १७ जुलै, २०१३ अन्वये आदिम आदिवासीसह कोणताही पात्र लाभार्थी अत्योदय अन्न योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच शासन परिपत्रक दि. १७ ऑगस्ट, २०१३ अन्वये विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांनी शिधापत्रिकांची पडताळणी ही दक्षता समिती सदस्यांच्या उपस्थितीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवीमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील गगनचुंबी इमारतीत अग्निशमन यंत्रणा नसल्याबाबत

**(४२) * ७१३ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नवीमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील गगनचुंबी इमारतीत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात न आल्याने तर काही ठिकाणी देखभाल दुरुस्ती अभावी सदर यंत्रणा बंद असल्याने अग्निशमन यंत्रणा नसलेल्या इमारतीमध्ये आगीची दुर्घटना घडल्यास मोठया प्रमाणावर प्राणहानी होण्याची शक्यता असल्याने अशा इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत नवी मुंबई महानगर पालिकेच्या अग्निशमन विभागाकडून गेल्या दोन वर्षात 450 इमारतीच्या पदाधिका-यांना नोटीसा पाठविण्यात आल्या असतानाही अशा इमारतीच्या पदाधिका-यांनी त्याची दखल न घेतल्याने इमारतीत राहणा-या रहिवाशांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, लोकांच्या जिविताची खबरदारी न घेतलेल्या नवीमुंबई अग्निशमन दलाच्या नोटीसीची दखल न घेणाऱ्या इमारतीच्या पदाधिका-यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) अशंत: खरे आहे.
(2) व (3) या प्रकरणाची नवी मुंबई महानगरपालिकेकडून दखल घेण्यात आली असून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, 2006 व नियम 2009 मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत संबंधित क्षेत्रात नामनिर्देशित अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

एकंदर ४५० इमारतीपैकी ४४१ इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून उर्वरित इमारतीच्या पदाधिका-यांना याबाबत महानगरपालिकेमार्फत स्मरणपत्रे पाठवियात आली आहेत. ज्या इमारतीच्या पदाधिका-यांनी याबाबत अनुपालन केलेले नाही, अशा प्रकरणी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ८ अन्वये कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर प्रस्तावित आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील पुणेगाव दरसवाडी डोंगरगाव पोच कालव्यासाठी निधी सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी वितरीत न झाल्याबाबत

**(४३) * १०२५ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नाशिक जिल्ह्यातील पुणेगाव दरसवाडी डोंगरगाव पोच कालव्यासाठी आवश्यक असलेला केवळ दोन कोटी रुपयांचा निधी सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी वितरीत न झाल्यामुळे सदर कालव्याची किरकोळ कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) दरसवाडी पोहच कालवा हा उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा भाग असून प्रकल्पाच्या तृतिय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## लोअर पुस प्रकल्प वेणी( ता.महागाव जि.यवतमाळ ) मुख्य कालव्याची दुरुस्ती न करताच देयके काढल्याबाबत.

**(४४) * ४२१३ श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) लोअर पुस प्रकल्पाची लांबी 00 ते 62 किलोमीटर आहे, परंतु प्रत्यक्षात 40 कि.मी. च्या पुढे कधीच पाणी गेले नाही, तरीही कॅनलची दुरुस्ती करतांना 00 ते 62 कि.मी. पर्यंतची कामे न करताच सन 2010-11, 2011-12 व 2012-13 या कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने सदर कामाची देयके काढण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(2) मौजे सवना, चिलगव्हाण, खाडका, लेवा, हिवरा, आबोंडा, वाघनाथ, करंजी, शिरपूर, मायनर सोळा याची सन 2012-13 मध्ये दुरुस्ती न करताच देयके काढण्यात आली असल्याची तक्रार दिनांक 26 नोव्हेंबर, 2014 चे सुमारास मा.मुख्यमंत्री यांना नागपूर येथे श्री.पंजाबराव देशमुख, सामाजिक कार्यकर्ते यांनी दिली होती, हे ही खरे आहे काय,
(3) श्री.ढोके कालवा मोजणीदार सिंचन शाखा सवना हे कार्यरत असतांना त्यांनी शेतकऱ्यांच्याकडून केलेली वसुली शासकीय कोषागारात जमा केली नाही व आर्थिक अपहार केला याबाबतची तक्रार श्री.पंजाबराव देशमुख रा.खाडका ता.महागांव यांनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांना दिनांक 17 जानेवारी, 2014 चे सुमारास दिल्यानंतरही अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

लोअरपूस मध्यम प्रकल्पांतर्गत मुख्य कालव्याची लांबी ५० कि.मी. व पुच्छ वितरिकाची लांबी १२.५० कि.मी. असून एकूण ६२.५० कि.मी. लांबीची मुख्य वितरण प्रणाली आहे. सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या कि.मी.५० पर्यंत व पुच्छ वितरिकेच्या कि.मी. २ पर्यंत सिंचनासाठी पाणी देण्यात आले आहे. कालवा दूरूस्तीची कामे मुख्य कालवा कि.मी.५० पर्यंत करण्यात आली असून केलेल्या कामांची देयके निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात आलेली आहे.
(२) मौजे सवना, चिलगव्हाण, खाडका, लेवा, हिवरा, आबोंडा, शिरपूर, वाघनाथ व मायनर १६ ची कामे २०१२-१३ मध्ये सुरु करण्यात आली होती. त्याअंतर्गत झालेल्या कामांची देयके अदा करण्यात आली आहेत. उर्वरित कामे संबंधित कंत्राटदाराने केलेली नसल्याने त्या कामांची देयके अदा केलेली नाही.
(३) व (४) श्री.ढोके, कालवा मोजणीदार यांनी केलेल्या गैरवर्तणूकीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करुन त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील चिराबाजार, गिरगाव, कुर्ला, गोरेगाव आदि परिसरात सातत्याने दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(४५) * २८३ श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील चिराबाजार, गिरगाव, कुर्ला, गोरेगाव आदि परिसरात सातत्याने दुषित पाणीपुरवठा होत असल्याचे माहे सप्टेंबर, 2014 च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(3) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तदनुसार सदर ठिकाणी स्वच्छ शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात यते आहे,
(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अशंत:खरे आहे. चिराबाजार परिसरात दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झली नसून गिरगांव, कुर्ला व गोरेगांव परिसरात

दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबतच्या तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या होत्या.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे याबाबत वेळोवेळी पाहणी करण्यात आली आहे.
(३) दुषित पाणी पुरवठ्याच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी पाणी पुरवठ्याच्या वेळेत नळखाबातून फ्लशिंग करणे, दुषित पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतांच शोध घेण्याकरिता कॅमेरे टाकणे, दुषित पाणी पुरवठ्याच्या स्त्रोताचा शोध घेणे, शोधण्यात आलेल्या गळत्या तातडीने बंद करणे, जुन्या जलवाहिन्या खंडीत करणे, इत्यादी कार्यवाही बृहन्मुंबई महानरपालिकेतर्फे करण्यात आली आहे. तद्नंतर पाण्याचे नमुने तपासणीकरीता महानगरपालिका प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असता ते पिण्यायोग्य असल्याची खातरजमा बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या धर्तीवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत नियमावली अतंर्भूत करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठविला असल्याबाबत.**

**(४६) * २८५० श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व ठाणे ही दोन्ही शहरे लागून असून भौगोलिक परिस्थितीमध्ये तसेच जमिनीच्या व सदनिकांच्या किमतीमध्ये फार जास्त फरक नसल्याने मुंबईच्या धर्तीवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत नियमावली अतंर्भूत करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईप्रमाणेच ठाणे शहरातील झोपडपट्टीना मुंबईमध्ये लागून असलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनेची नियमावली लागू करुन पुनर्विकास योजना राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक ०९/०९/२०१४ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व याबाबतची अमंलबजावणी करण्यात आली आहे काय,
(४) अद्यापही याबाबतची अमंलबजावणी केली नसल्यास ती तातडीने करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) होय.
(2) ठाणे महानगरपालिका`क्षत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विशिष्ट तरतूद ठाणे शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याबाबतची अधिसुचना दिनांक ११/९/२०१४ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.
(3) ठाणे महानगरपालिका`क्षत्रासाठी लागू करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये झोपडीधारकांसाठी बांधण्यात येणा-या`क्षत्राइतका भूनिर्देशांक विक्री करीता अनुज्ञय करण्यात आलेला आहे. सदय:स्थितीत ठाणे महानगरपालिका`क्षत्रामधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मंजूरी देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना देण्यात आलेले असून त्याबाबती अधिसुचना दिनांक ११/९/२०१४ रोजी गृहनिर्माण विभागाने पारीत केली आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चारकोप कांदिवली (प) (मुंबई) येथील सर्व्हे क्र.४१, सीटी एस. प्लॉट क्र.१, आर.डी.पी. १, हा ८ ते ९ एकराचा भूखंड कला सहकारी गृहनिर्माण संस्थेला भाडे पट्टयावर म्हाडाने वितरीत केल्याबाबत**

**(४७) * ३२५२ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप कांदिवली (प) (मुंबई) येथील सर्व्हे क्र.४१, सीटी एस. प्लॉट क्र.१, आर.डी.पी. १, हा ८ ते ९ एकराचा भूखंड कला सहकारी गृहनिर्माण संस्थेला भाडे पट्टयावर १९७६ साली म्हाडाने वितरीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा कुंभार समाजासाठी हा भूखंड देण्यात आला होता. ज्या प्रयोजनासाठी हा भूखंड वितरीत केला, ते प्रयोजन ४० वर्ष उलटून ही पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूखंडावर स्थानिक गुंडांनी अतिक्रमण केले आहे, येथे अनधिकृत व्यवसाय व पाणी चोरी, सर्वत्र कचरा पसरुन, पर्यावरणाची हानी होत आहे,

(४) असल्यास, या प्लॉटवरील अनधिकृत अतिक्रमण हटविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही. तथापि, सदर जमीन कुंभार कला सहकारी संस्थेस औद्योगिक प्रयोजनार्थ (विटा, मडकी इ.) भाडे पट्टयाने अटी शर्तीस अधिन राहून दि.08.04.1971 शासन ज्ञापनानवये मंजूर केली होती. परंतु संस्थेने अटी शर्तीचा भंग केल्याने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दिनांक 21.05.1981 च्या आदेशान्वये भाडे पट्टा रद्द करण्यात आला होता. तदनंतर स.नं.41 पै न.भू.क्र.3ब/2 मधील 18000 चौ.मी.क्षेत्र कुंभार कला सहकारी संस्थेस दिनांक 24.02.2004 व शासन शुध्दीपत्रक दिनांक 11.3.2004 अन्वये कब्जे हक्काने अटी शर्तीवर निवासी प्रयोजनार्थ मंजूर केले आहे.

(३) सदर भूखंडावर घातक रसायन व वस्तुंचा साठा करण्यात आल्याचे आढळून आलेले नाही. तसेच सदर भूखंडावर महानगरपालिकेच्या पाण्याची चोरी होत असल्याबाबतची तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) सदर भूखंडावरील अतिक्रमण धारकांविरुध्द बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत कारवाई करण्यात आली असून या विरुध्द अतिक्रमण धारकांनी मा.दिवाणी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यांमध्ये मा.दिवाणी न्यायालयाने स्थगिती आदेश पारित केलेले असून प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

-----------------

**आबिंवली ( जि.ठाणे ) येथील इराणी वस्तीत पोलीसांना महिला व पुरुषांनी बेदम मारहाण केल्याची घटना**

**(४८) * १६१९ डॉ.बालाजी किणीकर (अबंरनाथ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) आबिंवली (जि.ठाणे) येथील इराणी वस्तीत पोलीसांना अनेक गुन्ह्यात हवा असलेला गुन्हेगार पकडण्यासाठी गेलेल्या ठाण्यातील कापूरबावडी पोलीसांना इराणी वस्तीमधील महिला व पुरुषांनी बेदम मारहाण केल्याचे दिनांक 24 सप्टेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास ,चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) हे खरे आहे.
आबिंवली ता.कल्याण जि.ठाणे येथे दि.२०/०९/२०१४ रोजी कापूरबावडी पोलीस ठाणे गु.र.नं. ३३४/२०१४ भा.दं.वि. कलम ३९२, ३४ मधील पाहिजे आरोपी यास कापूरबावडी पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी ताब्यात घेऊन कायदेशीर कर्तव्य करीत आताना आरोपीच्या नातेवाईकांनी पोलीसांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली आणि पोलीसांना चावे घेऊन जखमी केले. तसेच कामात अडथळा निर्माण करुन आरोपीस पळवून लावले.
२) व ३) सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु असून, या संदर्भात महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६५७/२०१४ भा.दं.वि. कलम ३५३,३३२,३३३,१४१,१४२,१४३,१४६,१४७,२२५, (अ) (ब), क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट, १९३२ कलम ७ प्रमाणे दि. २०/०९/२०१४ रोजी एकूण २३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मराठावाड्यातील गोदावरी नदीवरील बॅरेजेसच्या कामाकरीता निधी उपलब्ध करणेबाबत**

**(४९) * ३२८५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मराठवाड्यामध्ये गेल्या 10 वर्षात जवळपास 8 वर्ष दुष्काळाची परिस्थिती असून मराठवाड्यातील बहुतांशी सर्व जिल्हात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मराठवाड्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे तसेच गोदावरी नदीवरील बॅरेजेस व इतर ठिकाणी असलेल्या बॅरेजची कामे ही अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त जलसंधारणाची व बॅरेजची कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,
(4) असल्यास, अपूर्ण असलेल्या कामासाठी निधी उपलब्ध करुन ही कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,
(5) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** १) अशंत: खरे आहे.
मागील ३-४ वर्षा पासून मराठवाड्यात पर्जन्य मानाची सरासरी कमी झाल्यामुळे काही जिल्ह्यात टंचाईची तीव्र परिस्थिती निर्माण झाली आहे.
२) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने प्रशाकीय मान्यता प्रदान केलेली ७०१ कामे व १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेची शासनामार्फत मंजुरी प्रदान केलेली २० कामे प्रगतीपथावर आहेत.

गोदावरी नदीवरील १५ बंधा-यापैकी १२ बंधा-यांमध्ये पाणीसाठा होत आहे. उर्वरीत ३ बंधा-यांची (तारुगव्हाण, अतेंश्वर व बळेगाव उ.पा.बंधारा यांची) कामे निधी उपलब्धतेनुसार प्रगत आहेत.
मांजरा नदीवरील १२ बंधारे असून त्यापैकी ७ बंधा-यामध्ये पाणीसाठा होत आहे. उर्वरीत ५ बंधा-यांची कामे निधी उपलब्धते नुसार प्रगत आहेत. तसेच मांजरा नदीवरील ३ को.प. बंधा-यांचे उच्च पातळी बंधा-यामध्ये रुपांतरणची कामे असून ३ ही कामे पूर्ण झाली आहेत.
तेरणा नदीवर १ बंधारा असून त्याचे काम निधी उपलब्धते नुसार प्रगत आहेत. तसेच तेरणा नदी वरील ९ को.प. बंधा-याचे उच्च पातळी बंधा-यामध्ये रुपांतरणाची कामे असून ३ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामे निधी उपलब्धते नुसार प्रगत आहेत.
पैनगंगा नदीवरील ६ पैकी ५ कामे चालू असून एका बंधा-यंचे काम लवकरच चालू करण्यात येईल.
सिंदफणा नदीवर २ बंधारे असून त्यातील सिरसमार्ग भौतिक दृष्ट्यापुर्ण झाले असून रोषनपुरी बंधा-याचे काम चालू आहे.
रेण नदी वरिल एकूण ३ को. प. बंधा-यंची नुतनीकरणाची कामे चालू आहेत.
३) ० ते २५० हेक्टर सिंचनक्षमतेची जलसंधारण महामंडळाने प्रशाकीय मान्यता प्रदान केलेली ७०१ कामे व जलसंधारण विभागामार्फत २० कामांना प्रशाकीय मान्यता प्रदान केली असून अशी दोन्ही मिळून ७२१ कामे प्रगतीपथावर आहे व जलसंपदा विभगांतर्गत असलेल्या बॅरेजसची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार प्रगत आहेत.
४) ० ते २५० हेक्टर सिंचनक्षमतेची प्रगतीपथावरील ७२१ कामे पुर्ण करण्यासाठी एकूण रुपये ३४०.१९ कोटी निधीची आवश्यकता असून सदरची कामे जुन २०१६ अखेरपर्यंत पुर्ण करण्यंची नियोजन आहे. जलसंपदा विभागाच्या बंधा-याची कामे पुर्ण करण्यासाठी रुपये १३०० कोटी निधीची आवश्यकता असून अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार बंधा-याची कामे पूर्ण करण्याबाबतचे नियोजन आहे.
५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**कर्नाटक राज्यातून (ता.मोहोळ, जि.सोलापूर) या राष्ट्रीयमार्गावरुन दहा चाकी गाडीतून वाळू पॅकीग करुन वाळूसमवेत चंदनाची वाहतूक होत .असल्याबाबत....**

**(५०) * ९४५ श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कर्नाटक राज्यातून (ता.मोहोळ, जि.सोलापूर) या राष्ट्रीयमार्गावरुन (नॅशनल हायवे) माहे मे,2014 पासून दहा चाकी गाडीतून वाळू पॅकीग करुन वाळूसमवेत चंदनाची वाहतूक होत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वाळू व चंदनाच्या लाकडाची होत असलेली तस्करी बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरुन दहा चाकी गाडीतून वाळू पॅकीग करुन वाळू समवेत चंदनाची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२), (३) व (४)

सोलापूर जिल्ह्यात जानेवारी, २०१४ ते नोव्हेंबर, २०१४ अखेर २०९ वाळू चोरीचे गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३४९ आरोपीना अटक करुन रु. १,३७,७१,७७८/- एवढ्या रकमेची वाळू जप्त करण्यात आली आहे. तसेच वाळूसंदर्भात कारवाई करण्यासाठी महसूल विभागाने पोलीस बंदोबस्ताची मागणी केल्यास त्यांना पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येतो.

-----------------

**कोल्हापूर, कागल व हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी मक्तेदार ग्लोबल इन्व्हर्स कंपनीकडून विनाप्रक्रिया केलेले रसायनमिश्रित सांडपाणी थेट पंचगंगेत सोडल्याबाबत**

**(५१) * २८२५ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर, कागल व हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी मक्तेदार ग्लोबल इन्व्हर्स कंपनीकडून विनाप्रक्रिया केलेले रसायनमिश्रित सांडपाणी थेट पंचगंगा नदीत सोडण्यात येते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संबंधित कंपनी महिन्याकाठी येथील कंपन्यांकडून रसायनमिश्रित सांडपाण्यांवर प्रक्रिया करण्यासाठी लाखो रुपयांचे भाडे घेते, हे ही खरे आहे काय,

(3) असे असतानांही सदर कंपनी विनाप्रक्रिया रसायनमिश्रित सांडपाणी सोडत असल्यासंदर्भात संबंधित अधिका-यांकडे तक्रार करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे

(5) असल्यास चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(6) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ठरवून दिलेल्या दरानुसार संबंधित सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा चालविणाऱ्या संस्थेकडून औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सभासद असलेल्या उद्योगांकडून दरमहा शुल्क आकारण्यात येते.

(३), (४) व (५) सदर सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा जून, २०१४ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीत ग्लोबल इन्व्हर्स कंपनीमार्फत चालविण्यात येत होती. १ ऑक्टोबर, २०१४ पासून सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा असोसिएशनने चालवण्यास घेतली असून ऑपरेशन व मेन्टनन्स चे काम मे. थरमॅक्स लि.या कंपनीस दिले आहे. सद्य:स्थितीत सर्व सभासद उद्योगांकडून सुमारे ६.५ द.घ.लि. इतक्या सांडपाण्यावर सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेत प्रक्रिया करण्यात येत असून प्रक्रियाकृत सांडपाणी हे औद्योगिक क्षेत्रातील ३५ एकर HRTS पट्ट्यामध्ये वापरले जाते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणे मधून प्रक्रियाकृत सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्याच्या मानाने HRTS ची पाणी शोषण्याची क्षमता कमी असल्याने हे पाणी विविध मार्गाने तळंदगे ओढ्यामार्फत नदीत मिसळल्याने नजीकच्या काळात तळंदगे ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कोल्हापूर यांना सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेला संलग्न असणाऱ्या कारखान्याचा पाणी पुरवठा कमी करण्याबाबत आदेश काढण्यात आले. तद्नुसार सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेला प्रस्तावित आदेश देण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेमधील दुरुस्ती व सुधारणेचे काम प्रगती पथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली ( ता.कल्याण, जि.ठाणे ) येथील दावडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना झालेला त्रास

**(५२) * १८०९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) डोंबिवली ( ता.कल्याण, जि.ठाणे) येथील दावडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत दूषित पाणीपुरवठा झाल्याने सुमारे सातशे नागरिकांना उलटी, जुलाब, पोटात दुखणे आदि त्रास होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन १५ वर्षे जुनी आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) दावडी गावास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबीवली यांचेकडून पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर गावातील अस्तित्वातील पाईपलाईन 15 वर्षापूर्वीची जून असली तरी तरी कालबाहय झाली नसून त्यास गळत्या झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे त्या बदलण्याची आवश्यकता नाही. दिनांक 31.10.2014 रोजी पाण्याच्या टाक्याची तपासणी केली असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा गाळ अथवा कचरा आढळून आला नाही. तथापि सदरहू टाक्या पुन:श्च स्वच्छ करुन त्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबीवली यांचेकडून येणारे पाणी सदर साठवण टाक्यात साठवून त्यात टि.सी.एल.ची योग्य मात्रा टाकून ओ.टी घेतल्यानंतर पाण्याचे नमुने योग्य आल्यानंतर पिण्यासाठी पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आला आहे.

पाण्याचे शुध्दीकरण करुन पाणी पुरवठा करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ डोंबीवली यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यास लाच स्विकारतांना पकडल्याबाबत

**(५३) * ६४२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिकेच्या सुनिल बने या अधिका-यास लाच स्विकारतांना दिनांक 17 जून, 2014 रोजी वा त्या सुमारास पकडल्याची घटना घडली, हे खरे आहे का,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनामार्फत चैाकशी केली आहे का,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आहे व तद्नुसार सदर अधिका-यावर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील श्री.सुनिल बळीराम बने, उप करनिर्धारक व संकलक यांना खात्यांतर्गत चौकशीसापेक्ष महापालिकेच्या सेवेतून दिनांक १७ जून, २०१४ पासून

निलंबित करण्यात आले आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी मुंबई महानगरपालिकेमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधितांची निवेदने नोंदविण्याचे व कागदोपत्री पुरावा अभिलेखावर घेण्याचे कामकाज चालू आहे. तपास पूर्ण झाल्यानंतर अहवाल सक्षम अधिकाऱ्यांना सादर करण्यात येईल.

-----------------

**कोयना धरणातील लेक टॅपिंगचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(५४) * १०६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
1) कोयना धरणातील लेक टॅपिंगचे काम दोन वर्षात पूर्ण होणे आवश्यक असताना मात्र 6 वर्षे पूर्ण होऊनही सदरील कामात अनियमितता तसेच वीजनिर्मीती पूर्णत: झाली नसल्याने ग्राहकांना भारनियमनासारख्या संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक 29 ऑक्टोंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
2) असल्यास, उक्त लेक टॅपिंगच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,
3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत /

**श्री. गिरीष महाजन :** १), २), ३) व ४) लेक टॅपिंगचे काम पूर्ण झाले आहे. तथापी कोयना प्रकल्पाबाबत जनहीत याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अतंरिम सुनावणी दरम्यान दिलेल्या आदेशानुसार याचिकेतील नमूद मुद्याची चौकशी करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना अहवाल सादर करण्यासाठी श्रीमती मालिनी शंकर, भा. प्र. से. यांची नियुक्ती शासनाने दिनांक ०१ डिसेंबर, २०१४ रोजी केली आहे.

-----------------

**कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको वसाहतीतील रहिवाशांच्या पाणीटंचाईबाबत**

**(५५) * ८६७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको वसाहतीतील साडेसहाशे सोसायटीमधील दोन लाख रहिवाशांना पाणीटंचाईच्या समस्येने ग्रासले असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मागील एक महिन्यापासून तेथील काही सोसायट्या टॅकरच्या पाण्याचा वापर करीत असल्याने यासंदर्भात अनेक तक्रारी संबंधित रहिवाशांनी सिडको प्रशासनाकडे देऊनही अद्यापही उचित कार्यवाही न झाल्याने पाण्याअभावी सदरहू रहिवाशांची गैरसोय होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(3) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबईतील कामोठे विभागाची लोकसंख्या विचारात घेता प्रतिदिन सुमारे ३८ दशलक्ष लिटर (द.ल.लि.) पाण्याची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत नवी मुंबई महानगरपालिकेच्या उदंचन वाहिनीवरुन सरासरी ३३ द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात येत असून अतिरिक्त ५ द.ल.लि. प्रति दिन

इतका पाणी पुरवठा आवश्यक आहे. सध्या उपलब्ध होणारा अपुरा व कमी दाबाचा पाणीपुरवठा तसेच कामोठे येथील पाणी वितरणाचे विशाल जाळे यामुळे कामोठे येथील काही भागात अपुरा तसेच कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होतात, ही वस्तुस्थिती आहे.

प्रश्नाधिन भागात अतिरिक्त पाणी पुरवठा करण्यासाठी सिडकोने लघु कालीन, मध्य कालीन व दिर्घ कालीन उपाय योजना आखल्या असून कामोठे विभागात पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होण्याकरीता सिडको प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये अमरावती येथील औद्योगिक वसाहतीतील प्रदूषित पाणी सोडल्यामुळे परिसरातील नागरिकांचे व जनावरांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(५६) * ३९५४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) अकोला जिल्ह्यातील वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या पाण्यामध्ये अमरावती येथील औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषित पाणी सोडण्यात येत असल्याने नदी पात्रातील पाणी दुषित होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त पाण्याचे नमुने तपासणी करण्यात येऊन पाणी प्रदूषित असल्याचा दाखला तपासणी यंत्रणेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) सदर दुषित पाण्यामुळे अकोला जिल्ह्यातील म्हैसांग व परिसरातील इतर गावे प्रभावित होऊन लोकांचे व गुरांचे आरोग्य धोक्यात आले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

अमरावती तसेच अकोला औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांमधून अल्प प्रमाणात औद्योगिक सांडपाण्याची निर्मिती होते. त्यासाठी सर्व उद्योगांनी स्वतंत्र औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारलेली असून प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाण्याचा उद्योग परिसरातील बागबगीच्याकरीता वापर करण्यात येतो.

(२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जलगुणवत्ता तपासणी कार्यक्रम (NWMP) अतंर्गत नदीच्या पाण्याचे नमुने गुणवत्ता तपासणी करण्याकरीता गोळा करण्यात येतात. पुर्णा नदीच्या पाण्याच्या पृथ:क्करण अहवालावरुन BOD आणि DO ची गुणवत्ता नागरी सांडपाण्याच्य विनाप्रक्रिया निर्गतीमूळे काही प्रमाणात खालावली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) अकोला जिल्ह्यातील म्हैसांग, घुसर, निंबा, केळीवेळी या गावातील दवाखान्यांमध्ये गुरेढोरे प्रदूषित पाण्याने प्रभावित झाल्याची कोणत्याही प्रकराची तक्रार वा बाधित पशु संबंधित पशुवैद्यकिय दवाखान्यांत दाखल झाले नसल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पूर्णा नदीचे पाणी दुषित झाल्याचे निदर्शनास आल्याचे कळविले आहे. तथापी, वसाहतीचे सांडपाणी हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे पुर्णा नदीत मिसळत नाही हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी केलेल्या पाहणी दरम्यान विनाप्रक्रिया नदीत सोडल्याने पदीचे पाणी काही प्रमाणात प्रदूषित झाले असल्याचे आढळून आले आहे.

(४) व (५) सद्य:स्थितीत, अमरावती महानगरपालिकेकडून ४४ द.ल.लि. घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया सयंत्रणा बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून उर्वरीत १९ द.ल.लि.

घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि.०९.०४.१३ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

-----------------

**नागपूरातील देवनगर येथील जोशी यांच्या रविराज कंपनीने हजारो नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत.**

**(५७) * १३८१ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूरातील देवनगर येथील जोशी यांच्या रविराज कंपनीने आर्थिक फसवणूक करुन हजारो नागरिकांचे करोडो रुपये बुडविल्याप्रकरणी दि. 5 जुलै, 2014 रोजी वा त्या सुमारास धंतोली पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास , चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधीत दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(4) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीवरुन धंतोली पोलीस स्टेशन, नागपूर येथे अ.प.क्र.176/2014, भा.दं.वि कलम 420, 406, 120 (बी) स कलम 3 महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण कायदा- 1999 अन्वये दिनांक 8.7/2014 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी रविराज इन्वेस्टमेंट आणि स्ट्राटेजिस कंपनीच्या नावे संचालक राजेश सुरेश जोशी व 8 आरोपीनी संगनमत करुन गुंतवणूकदारांना जास्त व्याजाचे/परताव्याचे प्रलोभन देऊन फिर्यादीचे रु.2,00.000/- व इत र गुंतवणूकदारांची कोटयवधी रुपयांची फसवणूक केली आहे. सदर गुंतवणूकदारांची फसवणूक झालेली मूळ गुंतवणूक रक्कम रु.4,56,37,920/- इतकी आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दि.7.8/.2014 रोजी अटक करण्यात आली आहे व इतर आरोपीताची मा.सत्र न्यायालय, नागपूर येथे अटकपूर्व जमीन प्रकरणी सुनावणी सुरु आहे. सदर प्रकरणात आरोपीकडून स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दि.30.9.2014 रोजी दोषीरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील पारशिवनी येथील १७ गावामधील नळ योजना बंद असल्याबाबत.**

**(५८) * ४००० श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील पारशिवनी येथील १७ गावामधील पुरविण्यात येणारी जीवन प्राधिकरण नळ योजना मागील अनेक दिवसापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काही ठिकाणी पाईप खराब झालेले असून त्यामुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होते, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सदर नळपाणी योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरण करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, बंद असलेली नळयोजना सुरु करणे व पाण्याची होत असलेली गळती थांबविणे तसेच सदर नळयोजना ग्रामपंचायतीला हस्तांतरण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. बबनराव लोणीकर :** (1) व (2) हे अशंत: खरे आहे,
नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी येथील १७ गावांसाठी कोणतीही नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत नसून केवळ पारशिवनी या गावासाठीच नळ पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सद्यस्थितीत राबविण्यात येत आहे. तथापि, दिनांक 14/6/2013 पासून योजनेद्यारे पाणी पुरवठा बंद आहे.
(3) होय,
(4) पारशिवनी येथील बंद असलेली नळ पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्तीची कामे त्वरीत पूर्ण करुन योजना संबधित ग्रामपंचायतीला हस्तांतरित करण्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे सदर पाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आलेली असून जलवाहीन्यांची जलदाब चाचणीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपुर चांदुर बाजार (जि.अमरावती) येथे अतिवृष्टीमुळे पाणी सोडण्यात आल्यामुळे तालुक्यातील 20 गावांमधील घरे पुर्णपणे जमिनदोस्त झाल्याबाबत

**(५९) * ३६४५ श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) अचलपुर चांदुर बाजार (जि.अमरावती) येथे दिनांक 22 व 23 जुलै, 2014 रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच दिनांक 27 जुलै, 2014 रोजी पुर्णा प्रकल्पातुन 3 हजार क्युसेक्स पाणी सोडण्यात आल्यामुळे चांदुर बाजार तालुक्यातील 20 गावांमधील 909 घरे पुर्णपणे जमिनदोस्त झाली आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या अतिवृष्टीग्रस्तांना पुनर्वसनासाठी आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे 12 ऑगस्ट, 2014 रोजी तसेच मा.मुख्यसचिव यांचेकडे दिनांक 30 जुलै, 2014 रोजी केली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, अद्यापपर्यंत या संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, अतिवृष्टीग्रस्तांना मदत देण्यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) दिनांक २३.७.२०१४ रोजी पूर्णा प्रकल्पाचे धरणातून २८२४ क्यूसेक्स विसर्ग सोडण्यात आलेला असून त्यामुळे कुठलेही नुकसान झालेले नाही. दिनांक २७.७.२०१४ रोजी धरणाच्या पाणलोट क्षत्रामध्ये व विश्रोळी येथे अतिवृष्टी झाल्यामुळे धरणातून ८७४२७ क्यूसेक्स विसर्ग सोडण्यात आला. त्यामुळे पुर्णा व चारगड नदीला आलेल्या पुरामुळे २० गावे प्रभावित होऊन ८५४ घराची पडझड झालेली आहे.
२) होय.

३) व ४) एकूण १७९५ बाधित कुटूंबांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आली आहे ८१५ घरांचे मुल्यांकन पुर्ण झाले असून मदत वाटपाची कार्यवाही सुरु आहे. तसेच ५ मृत व्यक्तीच्या कुटूंबांना मदत वाटप करण्यात आली आहे. पिकांच्या नुकसानीचे व खरडलेल्या जमिनींचे पंचनामे करण्यात आले असून मदत देण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

**मौजे जोडमोहा (ता. कळंब, जि. यवतमाळ) अतंर्गत रोजगार हमी योजनेची कामे कागदोपत्री केल्याचे दाखवुन कोटयवधी रुपयांचा केलेला अपहार**

**(६०) * ३९८६ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे जोडमोहा वनपरिक्षत्र (ता. कळंब, जि. यवतमाळ) येथे सन 2010 ते 2012 या काळात रोजगार हमी योजनेची कामे न करताच ती कागदोपत्री दाखवून मजुरांना मजुरी देताना मजुरांच्या यादीमध्ये शासकीय कर्मचारी तसेच मृत व्यक्तीचा समावेश दाखवुन कोटयवधी रुपयांची अफरातफर केल्याची घटना दि. 21 ऑगस्ट, 2013 रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी उपजिल्हाधिकारी (रोहयो) यवतमाळ यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे आणि त्याचे स्वरुप काय आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द, यवतमाळ यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांना सादर केला आहे, तसचे उपवनसंरक्षक, पांढरकवडा यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार वनविभागामार्फत झालेल्या कामांचा गुणवत्तेबाबत कार्यवाही अभियंता लघूपाटबंधारे स्थानिकस्तर यवतमाळ यांना तपासणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**लोटे औद्योगिक वसाहतीतील (ता.खेड, जि.रत्नागिरी) रासायनिक कारखान्यांतून होत असलेले प्रदूषण रोखणेबाबत**

**(६१) * ३१६७ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) लोटे औद्योगिक वसाहतीतील (ता.खेड, जि.रत्नागिरी) रासायनिक कारखान्यांतील जलप्रदूषण व वायुप्रदूषणाचा परिसरातील मानवी वस्तीवर परिणाम होऊन त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अनेकांना श्वसनाचे विकार, त्वचेचे विकार इ.सारखे आजार होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रदूषण रोखणेबाबत व नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (1) व (2) उपसंचालक, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांचे अहवालानुसार हे खरे आहे.
(3) लोटे परशुराम ता. खेड जि. रत्नागिरी येथील औदयोगिक वसाहतीत निर्माण होणा-या औदयागिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मोठया व मध्यम उद्योगाकडे प्रथम आणि दितीय तसेच काही उद्योगांकडे तृत्तीय स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा असून लहान उद्योगांकडे प्रथम स्वरुपाची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत आहे. काही उद्योगांकडून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पूनर्वापर केला जातो. सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमधील प्रक्रियाकृत सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार दाभोळ खाडीत करंबवणे येथे सुमारे ७.४८ कि.मी. अतंरावर सोडण्यात येते. सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे अद्यावतीकरण करण्याबाबतचा प्रकल्प अहवाल राष्ट्रीय पर्यावरण, अभियांत्रिकी व संशोधन संस्थेकडून (NEERI) संमत झाला असून याबाबत पूढील कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येत आहे.

लोटे परशुराम ता. खेड जि. रत्नागिरी येथील औद्योगिक वसाहतीतील हवा प्रदुषणकारी उद्योगानी उत्पादन प्रक्रियेतून निघणा-या उत्सर्जित वायूच्या नियंत्रणासाठी स्क्रबर व चिमणी बसवली आहे. काही उद्योगांनी डस्ट कलेक्टर इएसपी सारखी अत्याधूनिक संयंत्रणा बसवली आहे. NAAQM अतंर्गत चाळकेवाडी लोटे औद्योगिक वसाहतीनजीक हवेची गुणवत्ता सरासरी मर्यादेत असल्याचे आढळले आहे.

महाराष्ट्र्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सदर औदयागिक वसाहतीतील उद्योगांना अचानक भेट देवून जल आणि वायू प्रदूषण नियंत्रण संयंत्रेची तपासणी करण्यात येते व त्यात दोषी आढळलेल्या उद्योगांवर उचित कार्यवाही करण्यात येते. मार्च २०१३ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत दोषी आढळलेल्या ४ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश, १६ उद्योगांना अतंरिम निर्देश, १३ उद्योगांना प्रस्तावित निर्देश आणि २६ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर (जि.ठाणे )औद्योगिक`क्षत्रामध्ये निर्माण होणारे सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नवापूर येथील समुद्रामध्ये सोडले जात असल्याबाबत**

**(६२) * १२०७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) तारापूर (जि.ठाणे )औद्योगिक`क्षत्रामध्ये निर्माण होणारे सांडपाणी व त्यावर प्रक्रिया करणा-या सी.ई.टी.पी. ची क्षमता यामध्ये तफावत असून प्रतिदिन कमीतकमी 15 ते 20 दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नवापूर येथील समुद्रामध्ये सोडले जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2)असल्यास , सांडपाणी प्रक्रिया न करताच समुद्रात सोडल्यामुळे नवापुर समुद्र किना-यावर मोठया प्रमाणात मृत मासे आढळल्याचा तपासणी अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या औदयोगिक `क्षत्रातील असे प्रदूषण करणा-या कंपन्यांवर वेळोवेळी कारवाई करण्याची सूचना प्रदूषण मंडळ यांनी देऊनही या कंपन्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही , हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. रामदास कदम :** (1) हे खरे आहे.
(2) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत केलेला पाहणीअती अल्प प्रमाणात मोस मरतुकी झाल्याचे आढळले आहे.
(३) व (४) हे खरे नाही.
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना प्रदान केलेल्या संमतीपत्रातील अटीचे उल्लंघन केल्याचे आढळलेल्या दोषी उद्योगांवर जल(प्रतिबंध प्रदूषण नियंत्रण) कायदा, १९७४ व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा, 1981 अंतर्गत नियमितपणे कारवाई करण्यात आलेली आहे. शिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. टीईपीस-सीईटीपी, तारापूर व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ अ अंतर्गत निर्देश दिलेले आहेत.
राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेच्या शिफारशीनुसार 1000 मी.मी व्यासाची एचडीई सांडपाणी वाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळामार्फत फेरनिविदा काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील कार किंग टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स कंपनीने 100 हून अधिक गाडया भाडयाने देण्याच्या नावाखाली परराज्यात विकून कोटयावधी रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(६३) * २५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील कार किंग टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स कंपनीने 100 हून अधिक गाडया भाडयाने देण्याच्या नावाखाली परराज्यात विकून कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी चार जणांना आग्रीपाडा पोलिसांनी अटक केल्याचे माहे सप्टेंबर, 2014 च्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील आरोपीवर कोणती कडक कारवाई केली तसेच मुंबई शहरात गाडया भाडयाने देण्याच्या नावाखाली बनावट कंपनी उघडून फसवणूक करण्याचे प्रकार सर्रास सुरु असून अशा प्रकाराला चाप लावण्यासाठी शासनास्तरावरुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) प्रकरणी आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र २६३/१४ अन्वये भादंविस कलम ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२0 (ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल असून चार आरोपीना अटक करण्यात आली असून दोषारोप अटक करण्यात आली असून दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

तसेच अशा प्रकारच्या कंपन्या विरुध्द तक्रारी प्राप्त होताच गुन्हे दाखल करुन अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यात येते व आरोपीना अटक करुन मालमत्ता हस्तगत करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर) या प्रकल्पाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्वहार**

**(६४) * ३३५६ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) नाशिक जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना काचुर्ली (ता.त्र्यंबकेश्वर) या प्रकल्पाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आल्याची जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीनी दिनांक 9 ऑगस्ट, 2014 रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच सदर प्रकल्पाच्या कामाची महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था तसेच दक्षता व गुणनियंत्रक विभागाकडून तपासणी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
(5) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. गिरीष महाजन :** (1) होय.
(2) होय.
(3) नाही.
(4) `क्षत्रीय कार्यालयाच्या प्राथमीक अहवालनुसार सांडवा व पक्षभिंतीचे काम बाकी असल्यामुळे संकल्पित पाणी पातळी पेक्षा कमी पाणीसाठा होत आहे. पूर्ण पाणीसाठी करण्यासाठी आवश्यक सांडवा व पक्षभिंतीचे कामे करण्यात येत आहेत.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यामध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळातर्फे मागासवर्गीसय विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळा व वसतीगृहासाठी जनरेटर खरेदीमध्ये अपहार झाल्याबाबत**

**(६५) * ७९४ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सन २०१० -२०११ मध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळातर्फे आश्रम शाळा व वसतीगृहांसाठी दिलेल्या २० कोटी निधीतून जनरेटर खरेदीमध्ये सुमारे ६७ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ११ ऑगस्ट,२०१४ रोजी निदर्शनास आणला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अमरावती भ्रष्टाचार निर्मूलन समितीने शासनाकडे तक्रार केली होती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तक्रारीनुसार अकोला लाचलुचपत प्रतिबंधक पथकाला चौकशीचे आदेश दिले होते त्यानुसार या पथकाने वरीलप्रमाणे अपहार उघडकीस आणून अमरावतीचे अप्पर आयुक्त तसेच अकोला धारणी व पांढरकवडा येथील आदीवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच पुरवठादार कंपनीचे मालक शब्बीर अली मोहम्मद अली यांच्या विरुध्द दिनांक ११ ऑगस्ट २०१४ रोजी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दाखल गुन्ह्यानुसार चौकशी पूर्ण करून संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१),(२), (३), (४) व (५) श्री.सुनिल दिवान, सदस्य भ्रष्टाचार निर्मूलन समिती, अमरावती यांनी दिनांक २६/८/२०११ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनपत्र दिनांक २२/१०/२०१२ अन्वये या प्रकारणी उघड चौकशी करण्यात परवानगी देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी चौकशी अतं लाचलूचपत प्रतिबंधक विभागादवारे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम १०, १२, १३ (१) (ड) व भा.द.वि.कलम ४२०, ४६५, ४६९ व ४७१ अन्वये खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(१) श्री.विश्वंभर जळबाजी वरवंटकर, तत्कालीन अपर आयुक्त, आदिवासी विकास प्रकल्प, अमरावती यांचे विरुध्द सिटी कोतवाली पोलीस स्टेशन, अकोला येथे दिनांक ११/८/२०१४ रोजी गु.र.क्र ३०४५ /१४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) श्री.महेंद्रसिंग माणिकसिंग खेपरे, तत्कालीन प्रकल्प अधिकारी, अकोला यांचे विरुध्द पो.स्टे.पांढरकवडा, यवतमाळ येथे दिनांक १२/८/२०१४ रोजी गु.र.क्र. ३१८९/१४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) श्री.शब्बीर अली मोहम्मद अली, जी.एस.एटंर प्रायजेस यांचे विरुध्द पो.स्टे. धारणी, अमरावती येथे दिनांक १२/८/२०१४ रोजी गु.र.क्र. ३०७९/२०१४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त क्र. १ व २ येथील आरोपीना मा.उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. तसेच क्र.३ येथील आरोपीने एफ.आय.आर. रद्द करणेसाठी सी.आर.पी.सी. च्या कलम ४८२ अन्वये दाखल केलेल्या अर्जावर पुढील आदेशापर्यंत हस्तेक्षप करु नये असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत. तीनही गुन्हयाचा तपास सुरु आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये महावितरण कंपनीने कृषि पंपाना भारनियमन सुरु केल्याबाबत

**(६६) * २०७९ श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये महावितरण कंपनीने माहे नोव्हेंबर, 2014 पासून सरकारी पाणी पुरवठा संस्थांच्या खाजगी शेतक-यांच्या कृषि पंपाना अचानक दोन ते तीन तास पूर्व कल्पना न देता भारनियमन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कृषी पंपाना सलग 10 तास योग्य दाबाने वीजपुरवठा करण्याची मागणी शेतक-यांनी व सहकारी पाणी पुरवठा संस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(२) होय.
(३) शासन निर्णय व महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार कृषी पंपाना दिवसा ८ तास व रात्री १० तास चक्राकार पध्दतीने वीजेची उपलब्धता देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील वाकोडी गावाला विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याबाबत**

**(६७) * १५० श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :**
सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील शिवणी फिडरला वाकोडी गाव जोडले असून त्यामुळे वाकोडी गावाला विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने पाण्याअभावी बहुतांशी पिकांचे नुकसान होत असल्याने वाकोडी येथे फिडरचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक 8 ऑक्टोबर, 2014 पासून उपोषण आदोलन केलेले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, वाकोडी गावातील फिडरचे काम त्वरीत करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (1) होय.
(2) वाकोडा गाव नवीन वाहिनीवरील स्थलांतरीत करण्यासाठी नवीन 3 कि.मी. ची 11 के.व्ही. लाईनचे काम पूर्ण करण्यात आले आहे व वाकोडी हे गाव 11 के.व्ही. गौळ (बाजार) वाहिनीवर तातडीने जोडण्यात येत असून तद्नंतर तेथील वीज पुरवठा सुरळीत होईल.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दोंडाईचा( ता.शिंदखेडा जि.धुळे) येथे मंजूर असलेल्या 3300 मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत प्रकल्पांसाठी जमिनी संपादीत करण्याबाबत**

**(६८) * ८१८ श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) दोंडाईचा ( ता.शिंदिखेडा जि.धुळे) येथे मंजूर असलेल्या 3300 मेगावॅट क्षमतेच्या औष्णिक विद्युत प्रकल्पांसाठी जमिनी संपादीत करण्याचे काम प्रगतीपथावर असून केवळ 20 टक्के जमिनी संपादना अभावी कोट्यावधीचा प्रकल्प अडला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीत शिल्लिक असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी ह्या बागायती असल्याने त्यांना दर वाढवून मिळावा अशी मागणी शेतकऱ्यांची आहे मात्र त्याकडे शासनाने लक्ष न दिल्यामुळे दोन वर्षापासून प्रकल्पासाठी जमिनी खरेदीचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, शेतकऱ्यांना वाढीव दर देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ,

(4) नसल्यास  विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (1) नाही.
(2) नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रकल्प प्रत्यक्ष सुरु करण्याकरिता लागणा-या सलग जागेची पूर्तता करण्याचे तसेच प्राथमिक सर्वेक्षणाची कामे व इतर विभागाच्या लागणा-या मंजू-या मिळविण्याची प्रक्रिया शीघ्रगतीने सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या बोगस जाहिरात संस्था विरुध्द कारवाई करणेबाबत**

**(६९) * ४०७७ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई येथे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या बोगस जाहिरातीच्या संदर्भात माहिती घेण्याचे काम आस्की (ॲडव्हर्टायझिंग स्टॅंडडर्स कौन्सिल ऑफ इडिया) ही नियामक संस्था करते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर संस्थेच्या अखत्यारित ग्राहक तक्रार परिषद (कन्झ्युमर कम्प्लेन्टस कौन्सिल) कार्यरत असून त्यांच्याकडे बोगस जाहिरातीच्या तक्रारीची नोंद झाली असून सर्वाधिक संख्या आरोग्य व करिअर-शिक्षण या`क्षत्राच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, आतापर्यंत यासंदर्भातील किती प्रकरणांची नोंद झाली आहे,
(4) असल्यास, त्यातील किती प्रकरणांवर कारवाई करण्यात आली व  कारवाईचे स्वरुप काय आहे,
(5) असल्यास, उर्वरित प्रकरणांवर कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) होय.
(2) होय.
(3), (4) व (5) ॲडव्हर्टायझिंग स्टॅंडर्डस कोन्सिल ऑफ इडिया (ASCI) या संस्थेत एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ या कालावधीत आरोग्या संदर्भातील ६३२ तक्रारीची व करिअर-शिक्षणा संदर्भात ५४८ तक्रारीची नोंद झालेली आहे. त्यापैकी आरोग्या संदर्भातील ५९७ व करिअर शिक्षणा संदर्भात ५३९ तक्रारीत तथ्य आढळून आले आहे.

तथ्य आढळून आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जाहीरात देणा-या संस्थांना जाहिरात मागे घेणे किंवा त्यामध्ये योग्य ते बदल करणेबाबत ASCI कडून कळविण्यात आले होते. त्यानुसार ९०% जाहिरात संस्थांनी योग्य ते बदल करुन नव्याने जाहिराती प्रसिध्द केल्या आहेत.

ज्या जाहिरात संस्थांनी तथ्यहीन जाहिरातीमध्ये योग्य ते बदल केले नाहीत अशांना ASCI ने संबंधित प्रसार माध्यमे, इडियन ब्रॉडकास्टिंग फेडरेशन (IBF), इडियन न्युजपेपर सोयायटी (INS) यांच्याकडे संबंधित जाहिराती प्रसिध्द न करण्याच्या सूचना केल्या आहेत. तसेच माहिती व जनसंपर्क मंत्रालय, भारत सरकार ग्राहक संरक्षण मंत्रालय, भारत सरकार, औषध व अन्न प्रशासन, भारत सरकार सबंधित राज्य शासन यांना माहिती देण्यात आली आहे. याबाबत ASCI कडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**परभणी जिल्हयातील जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.8**
**दैठणा अतंर्गत वृक्ष लागवडीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(७०) * ३१५२ श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) परभणी जिल्हयातील जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र.8 दैठणा अतंर्गत श्री.राठौर, उपअभियंता यांनी वृक्ष लागवडीच्या कामात लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक 19 जून, 2014 रोजी वा त्यासुमारास उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो) परभणी यांचेकडे लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) परभणी यांनी चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषीवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) होय.
(2) व (3) तात्कालीन आमदार श्री. रामप्रसाद कदम बोर्डीकर यांचे लेटरहेडवर दि. १९.०६.२०१४ च्या पत्राद्यारे तक्रार प्राप्त झाली होती. तथापी आमदार महोदयांनी त्यांच्या दि.२३.०६.२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदरील दि. १९.०६.२०१४ रोजीचे पत्र त्यांच्या लेटरहेडवर परस्पर त्यांच्या सहमती विना खोटी तक्रार दिलेली असल्याचे कळविले. तसेच, सदरील काम हे रोहयो अतंर्गत झालेले नसल्याने या विभागाकडून चौकशी करण्यात आलेली नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवीमुंबई पोलीसांनी सीसीटीव्ही कॅमे-यांचे**
**इटंरनेटचे देयक न भरल्यामुळे बंद असल्याबाबत**

**(७१) * ७१४ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नवीमुंबई महानगरपालिकेने सहा कोटी खर्च करुन 262 ठिकाणी बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांचे इटंरनेटचे देयक नवीमुंबई पोलीसांनी न भरल्यामुळे रिलायन्स कंपनीने सदर कॅमेरे माहे मार्च,2014 मध्ये बंद केले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नवीमुंबई महानगरपालिकेने पुरविलेल्या सेवेचे देयक अदा न करण्याची कारणे काय आहेत,
(3) असल्यास, सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे नवीमुंबईत गुन्हयामध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता सदर सीसीटीव्ही कॅमे-यांचे इटंरनेटचे देयक तात्काळ अदा करुन कॅमेरे सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)
सीसीटीव्ही प्रकल्पाकरीता नवी मुंबई महानगरपालिकेने केलेल्या उभारणी खर्चाची परतफेड महानगरपालिकेस करण्याबाबत व यापुढील देखभाल दुरुस्ती व इटंरनेट लिज लाईन चे मासिक भाडे अदा करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना कळविले.
नवी मुंबई महानगरपालिकेच्या सदर विनंतीस अनुसरुन पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी या रकमेच्या परतफेडीकरीता शासन यांनी या रकमेच्या परतफेडीकरीता

शासन स्तरावर मागणी करण्यात आली असून अनुदान प्राप्त होण्यास काही कालावधी लागणे अपेक्षित आहे, असे नमुद केले व व्यापक जनहिताच्या दृष्टीने तूर्त हे भाडे नवी मुंबई महानगरपालिकेकडून अदा करण्यात यावे, असे महानगरपालिकेस कळविले.

या सर्व प्रक्रियेस काही कालावधी लागल्यामुळे देयक अदा करण्यास विलंब झाला. त्यामुळे संबंधित ठेकेदाराने दि.१५.०३.२०१४ रोजी इंटरनेट लिजलाईन सेवा खंडीत केली.

संबंधित ठेकेदारास नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दि.२९.०३.२०१४ रोजी देयक अदा करण्यात आल्यानंतर ही लिजलाईन दि.०१.०४.२०१४ पासून पूर्ववत सुरु करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सदर यंत्रणेची देयके नवी मुंबई महानगरपालिकेकडून वेळोवेळी अदा करण्यात येत आहेत.

-----------------

**माझगाव (मुंबई) येथील घोडपदेव येथे हिराबाई कंपाऊड मध्ये एका गोदामात अनधिकृत गॅस सिलेंडरचा साठा सापडल्याबाबत**

**(७२) * ३२५५ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) माझगांव (मुंबई) येथील घोडपदेव येथे हिराबाई कंपाऊड मध्ये एका गोदामात अनधिकृत ठेवलेला 486 गॅस सिलेंडरचा साठा सापडला असून साठेबाजास भायखळा पोलीसांनी अटक केल्याचे दिनांक 22 नोव्हेंबर, 2014 रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गॅस सिलेंडरचा साठा करण्यासाठी त्याच्याकडे परवाना नव्हता ,असेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास , चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

(४) प्रस्तूत प्रकरणी भायखळा पोलिस स्टेशन येथे दिनांक १०.११.२०१४ रोजी वि.स्था.गु.र.क्र.१३६/१४, बृहन्मुंबई म.न.पा. अधिनियम कलम ३९४(१)(ब), ४७१, ५१६(अ)(अ) अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक रण्यात आली आहे, सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

-

**(७३) * १६३३ डॉ.बालाजी किणीकर (अबंरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) अबंरनाथ (जि.ठाणे) शहरातील एमआयडीसी `क्षत्रात असलेल्या रासायनिक कारखान्यांत सन 2013-14 मध्ये 12 वेळा स्फोट, शॉटसर्किट झाल्याने भीषण आग लागल्याचे माहे मार्च, 2014 च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले असून गेल्या दोन महिन्यात तिघांच्या बळी गेला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अबंरनाथ शहराच्या पश्चिम भागातील मोरीवली एमआयडीसी मध्ये दिनांक 25 मार्च, 2014 रोजी हनाका केमिकल कंपनीमध्ये रिएक्शॅनमुळे झालेल्या स्फोटात कंपनीच्या संचालकाचा मृत्यू झाला तर कारखान्याशी संबंधीत नसलेले सात इसम गंभीर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(3)असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, अबंरनाथ शहरातील चारही रासायनिक वसाहतीतील कारखान्यांची वेळोवेळी तपासणी करण्यात येत आहे काय, वा नसल्यास शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली आहेवा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) अबंरनाथ (जि.ठाणे) शहराच्या एमआयडीसी`क्षत्रातील विविध कारखान्यांमध्ये जानेवारी, 2013 ते 31 ऑक्टोबर, 2014 दरम्यान कारखान्यांना आग लागणे व स्फोट होणे अशा एकूण 5 घटना घडल्यास आहेत.

जानेवारी, 2014 ते 31 मार्च, 2014 या काळात वरीलपेकी एका आगीची व एका स्फोटाच्या दुर्घनेचा यात समावेश आहे. या दोन घटनांमध्ये चार व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक व्यक्ती जखमी झाली आहे.
(2) होय. मे.हनाका ऑरगॅनिक्स प्रा.लि. या कारखान्यामध्ये दिनांक 25 मार्च, 2014 रोजी स्फोट होऊन लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत कंपनीची संचालक व एक बाहेरचा इसम मृत पावला आणि एक व्यक्ती किरकोळ जखमी झाली होती. जखमी व्यक्ती उपचारानंतर पूर्ववत कारवर हजर झाली आहे.
(3) होय.
(4) व (5) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून धोकादायक, रासयनिक कारखान्यांची प्राधान्याने निरीक्षणे करण्यात येतात. या कारखान्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. सर्व अपघातांची चौकशी करण्यात आली असून वरीलपैकी पाच घटनेत व्यवस्थापनावर कारखाने अधिनियमांतर्गत संबंधित न्यायालयात फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

-----------------

**मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) येथील सीना नदी व स्थानिक नाला यावरील कोल्हापूरी बंधा-याची झालेली दुरावस्था**

**(७४) * ९५२ श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मोहोळ तालुक्यात (जि.सोलापूर) येथील सीना नदी व स्थानिक नाला यावरील कोल्हापूरी बंधा-याचे बर्गे सुमारे 13 ते 14 वर्षापूर्वीचे असल्याने त्यांची दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर बर्ग्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(3) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर बर्ग्याची दुरावस्था सुधारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) अशंतः खरे आहे.
(2) होय.
(3) सध्या उपलब्ध बर्ग्यापैकी काह बर्ग्याची दुरवस्था झालेली असून निधी उपलब्धतेनुसार नविन वर्ग खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील भीषण पाणी टंचाई**

**(७५) * २८३१ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील 62 पैकी 22 गावांमध्ये जानेवारी ते जून या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होत असल्याने ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने माहे डिसेंबर, 2013 मध्ये या गावांसाठी 82 लाखांचा टंचाई आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला होता, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, एक वर्षाचा कालावधी होऊनही जिल्हाधिकारी कार्यालयाने या संदर्भात कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास,शासनाने पाणी टंचाई दूर करण्याकरीता कोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(4) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे अशंत:खरे आहे.
जानेवारी ते मार्च, २०१४ या कालावधीकरीता एकूण २ गावे १३ वाड्या व एप्रिल ते जून, २०१४ या कालावधीकरीता २४ गावे ९५ वाड्यांचा समावेश असलेला रु.८३.३४ लक्ष रकमेचा कृती आराखडा ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून तयार करण्यात आला होता. सदर कृती आराखडाए जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता.
(२) व (३) सन २०१४ च्या उन्हाळ्यात पाणी टंचाई भीषण असल्याची परिस्थिती नव्हती. त्यामुळे संभाव्य कृती आराखडयामधील उपाययोजनांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले नव्हते.
तथापि, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेमार्फत हातकणंवले तालुक्यात ज्या ठिकाणी टंचाई सदृष्य परिस्थिती होती अशा ठिकाणी जिल्हा परिषद स्वनिधीतून १० व स्थानिक विकास कार्यक्रमातून ११ इतक्या विंधन विहीरी घेण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(७६) * १०७ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इदांपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.भिमराव धोंडे (आष्टी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष साबने (देगलूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1)राज्यात विशेषत: मराठवाडयात तसेच सिंदखेडा,जि.धुळे,कारंजा जि.वाशिम देवरी जि.गोंदिया या भागात ५०% पेक्षा कमी पाऊस पडल्याने शेतक-यांना दुबार पेरणीच्या संकटास सामोरे जावे लागून खरीप व रब्बीचे पीक न आल्यामुळे १२३ तालुके टंचाईग्रस्त घोषित करण्यात आले असून शेतक-यांना दुष्काळाला तोंड द्यावे लागत आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या वर्षी मराठवाडयांतील ३५ शेतक-यांनी दुष्काळ आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केल्या हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांची चा-या अभावी उपासमार होत असून शेतक-यांकडून गुरासाठी चारा छावण्या उघडण्याबाबत मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास,दुष्काळ असतांनाही अधिकारी पीक आणेवारी ५० पैशांपेक्षा जास्त लावत असणे,ती लावण्यात येवू नये अशी मागणी ,नवीन पीक विमा सुरु करण्याची मागणी,गारपीठग्रस्तांची नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नसल्याने ती त्वरीत देण्याची मागणी,सोलापूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात सन २०१२-१३ मधील दुष्काळग्रस्तांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईच्या चौकशीची मागणी,देवरी जि.गोंदिया मधील दुष्काळग्रस्त शेतक-यांना रु.२ कोटी ७५ लाख रुपये मदत जाहीर करुनही ती अद्याप वितरीत न केल्याबाबत चौकशी करण्याची मागणी आणि दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(6) असल्यास,दुष्काळ जाहीर करुन शेतक-यांना तात्काळ मदत वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशंत: खरे आहे. जून ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीत सिंदखेडा, जिल्हा धुळे यैथे ९२.६% गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्यात ९०% व कारंजा, जिल्हा वाशीम येथे ५५.७% इतक्या पावसाची नोंद आहे. मात्र ज्या तालुक्यात कमी पावसाची नोंद आहे १३८ तालुके टंचाईग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.
(२) जानेवारी ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीमध्ये विविध कारणास्तव ४२० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.
(३) हे खरे नाही, तथापि, परभणी जिल्हयात शेतकऱ्यांकडून जनावरांच्या छावण्या उघडण्याबाबत मागणी होत आहे.
(४ टंचाईग्रस्त तालुके जाहीर करताना ५० पैशांची पीक आणेवारी विचारात न घेता ५० टक्के पेक्षा कमी पाऊस झालेले तालुके विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १९.८.२०१४ व दि.२५.८.२०१४ नुसार एकूण १३८ तालुके टंचाईग्रस्त जाहीर करण्यात आले. शासन निर्णय दिनांक २५.११.२०१४ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेली १९०५९ गावे टंचाईग्रस्त घोषित करण्यात आली आहेत. जानेवारी ते एप्रिल, २०१४ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे बाधीत सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर रु.२६३६.३५ कोटी इतका निधी प्रत्यक्षात वर्ग करण्यात आला आहे. सोलापूर जिल्हयात २०१२-१३ मधील दुष्काळग्रस्तांना देण्यात आलेल्या नुकसान भरपाईच्या चौकशीची मागणी करण्यात आलेली नाही. सन २०१२-१३ या वर्षी जिल्हयामध्ये दुष्काळी परिस्थिती नसल्यामुळे देवरी तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत वाटप करण्याच्या प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोंझरी (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील संदेश शिगवण यांच्या कुटूंबाना वाळीत टाकल्याचे प्रकरण**

**(७७) * ८६९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोंझरी (ता. अलिबाग, जि. रायगड) येथील संदेश शिगवण यांच्या कुटूंबीयांना वाळीत टाकल्याच्या प्रकरणात लेखी तक्रार देऊनही बराच कालावधी होऊनसुध्दा अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सामाजिक बहिष्कार प्रकरणांची गंभीर दखल घेऊन गुन्हे दाखल करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असतांनाही म्हसळा पोलीसांनी या आदेशाची पायमल्ली केली आहे हे पाहता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) प्रस्तूत प्रकरणी प्राप्त तक्रार अर्जाच्या चौकशी करीत अर्जदार व गैरअर्जदार यांना म्हसाळा पोलिस ठाण्यामध्ये दिनांक २४.९.२०१४ व दिनांक १०.११.२०१४ रोजी हजर राहणेबाबत लेखी समज देऊन सुध्दा हजर राहिले नाहीत. तदनंतर दिनांक ११.११.२०१४ रोजी अर्जदार यांच्या तक्रारीनुसार म्हसाळा पोलिस ठाणे कॉ.गु.र.नं. ३९/२०१४ भा.दं.वि.सं. कलम ३४१, १४९, ११४, १२० (ब), ५०४, ५०६, १५३ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये सामाजिक बहिष्कारासंबंधी तक्रारीवरील करावयाच्या कार्यवाहीबाबत दि.३०/०९/१३ रोजी गृह विभागामार्फत परिपत्रक सर्व पोलीस घटकांना निर्गमित केले आहे. प्रस्तूत प्रकरणी कोणत्याही प्रकारे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाची पायमल्ली झालेली नाही.

(३) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**रामटेक, जि.नागपूर येथील खिंडसी जलाशयात मासे मृतावस्थेत आढळल्याबाबत.**

**(७८) * ४००१ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक, जि.नागपूर येथील खिंडसी जलाशयाचे पाणी शहरासह अनेक गावांना पिण्याकरिता वापरण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याठिकाणी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी जलविमान सेवेच्या प्रात्यक्षिकामुळे जलाशयातील लाखो मासे मृत अवस्थेत पाण्यावर तरंगताना आढळले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी प्रदुषित झाल्यामुळे लाखो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) होय.

(2) नाही.

(3) नाही.

पिण्याच्या पाण्याची नियमित चाचणी नगर परिषद, रामटेक तर्फे घेण्यात येते, त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे प्रदुषण आढळल्याची तक्रार नगर परिषद रामटेक प्राप्त झालेली नाही.
(4) व (5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भात शेतकऱ्यांच्या शेतात सिंचन विहीर बांधल्यानंतर कृषी पंपाची वीज जोडणी मिळत नसल्याबाबत.**

**(७९) * ३९९१ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) विदर्भामध्ये विशेषत: यवतमाळ जिल्ह्यामध्ये शासनाकडून अल्पभूधारक शेतकऱ्यांना सिंचनातून आर्थिक समृध्दी मिळावी यासाठी विविध योजना राबवून सिंचन विहिरीचे बांधकाम करण्यास अनुदान मंजूर केल्यानंतर शेतकऱ्यांनी विहिरीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर त्यांना विज कंपनीकडून वीज पुरवठा मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शेतकऱ्यांनी वीज कंपनीकडून मागणी केलेली मागणी पत्राची रक्कम भरल्यानंतर देखील २ ते ३ वर्षानंतर कृषी पंपाला वीज जोडणी देण्यात आलेली नाही, हेही खरे आहे काय,
(3) वीज कंपनीकडून वीज जोडणी देण्यात न आल्याने शेतकऱ्यांना विहिर योजनेचा लाभ होत नसल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होवून उत्पन्नात घट येत असून विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आतमहत्येचे सत्र सुरू आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, शासकीय योजनेतून विहीर योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील कृषी पंपाना प्राधान्याने वीज वितरण कंपनीकडून वीज जोडणी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (1) हे अशंत: खरे आहे
धडक सिंचन योजने अतंर्गत तयार झालेल्या एकुण विहिरीपैकी यवतमाळ जिल्ह्यामध्ये १२५६ इतके अर्ज कृषीपंप विद्युत जोडणी मिळण्याकरिता प्राप्त झाले असून यापैकी १०८१ इतक्या अर्जदारांनी वीज जोडणीसाठी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे. यापैकी नोव्हेंबर, २०१४ अखेर ६१९ इतक्या कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या असून ४६२ इतके अर्जदार प्रलंबित आहेत.
(2) हे अशंत: खरे आहे
यवतमाळ जिल्ह्यामध्ये धडक सिंचन योजने अतंर्गत मार्च २०१२ पूर्वीचे एकूण ८७ अर्जदारांनी वीज जोडणीसाठी आवश्यक रकमेचा भरणा केलेला असून सदर अर्जदार प्रलंबित आहेत.
(3) नाही.
(4) या योजनेतील लाभार्थ्याची कामे पायाभूत आराखडा -2 योजनेतून करण्यात येत आहेत.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हा रुग्णालयाला एमआरआय मशीन देणेबाबत.**

**(८०) * ८७३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रायगड जिल्हा रुग्णालयातील सीटीस्कॅन मशीन आरोग्य संचालनालयाच्या आदेशानुसार माहे ऑगस्ट 2014 मध्ये माणगांव उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आली असून सदरहू सीटीस्कॅन मशीनच्या बदल्यात रायगड जिल्हा रुग्णालयाला एमआरआय मशीन अद्यापही देण्यात आली नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त कारणास्तव रुग्णांची होणारी गैरसोय दूर करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** १) हे अशंत: खरे आहे.
जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथील सी.टी. स्कॅन मशिन उप जिल्हा रुग्णालय मानगाव येथे दि.१०.०९.२०१४ रोजी स्थलांतरीत करण्यात आली आहे. तथापि, जिल्हा रुगणालय रायगड येथे शासनाच्या धोरणानूसार एम आर आय मशिन पुरविण्याचे प्रस्तावित नाही.
२) सार्वजनिक व खाजगी भागीदारी तत्वांतर्गत GE wipro यांच्या सहकार्यासने Radiology Imaging Diagnostic Centers अतंर्गत जिल्हा रुग्णालय रायगड येथे सी.टी. स्कॅन मशीन व एक्स-रे मशिन या सुविधा पुरविण्याची कार्यवाही सुरु आहे.
३) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.